# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०६ मार्च, २०१८ / फाल्गुन १५, १९३९ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) वित्त व नियोजन, वने मंत्री**<br>**(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री**<br>**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**<br>**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**<br>**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**<br>**(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ९०**

---

### कुपोषणग्रस्त मुलांच्या कुटूंबासाठी महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजनेंतर्गत रोजगार मिळण्याबाबत

**(१) * ३८६९७ श्री.जयंत पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुपोषणग्रस्त ६,६०,००० मुलांच्या कुटुंबासाठी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत त्यांच्या वास्तव्याजवळ गवत कापण्याचे काम देण्याचा शासनाने दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्णय घेऊनही प्रशासनाने त्याची अंमलबजावणी केली नसल्यामुळे कोणालाही रोजगार मिळाला नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी आणि ग्रामिण भागातील कुपोषित बालकांच्या राहण्याचे ठिकाणाजवळ वन जमिनीत आणि इतर जमिनीत गवत काढण्याचे काम रोजगार हमीतून दिले जाणार होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) नाही, हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या कार्यान्वयीन मार्गदर्शक सूचनांच्या पुस्तिकेतील प्रकरण ७ अंतर्गत मुद्दा क्र.७.३.२ नुसार गवत कापणीचे काम हे अनुज्ञेय कामांमध्ये समाविष्ट नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी स्वच्छ भारत अभियान योजनेत गैरव्यवहार केल्याबाबत

**(२) * ३८५०१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३५४१० ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी स्वच्छ भारत अभियान योजनेत केलेले आर्थिक गैरप्रकार, अनियमितता, वित्तिय मर्यादा डावलणे व इतर गैरप्रकारांची मुद्देनिहाय चौकशी करून त्यांना निलंबित करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाव्दारे मुख्य सचिव यांच्याकडे सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्यास्तरावरुन प्राथमिक चौकशी करण्यात आलेली आहे. प्राथमिक चौकशी अहवालातील निष्कर्ष विचारात घेऊन तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी व इतर संबंधित ८ गट विकास अधिकारी तसेच कार्यकारी अभियंता (बांधकाम) व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडून खुलासे मागविण्यात आले होते. विभागीय आयुक्त कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या सदरील खुलाशांची विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे मार्फत तपासणी करण्यात येत आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील प्राथमिक आश्रमशाळेस मान्यता देण्याबाबत

**(३) * ३९०४० श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील अहिल्यादेवी महिला व बालविकास मंडळ, पारवा या संस्थेला वि.जा.भ.ज. माध्यमिक शाळा सुरु करण्यास मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच माध्यमिक शाळेसाठी विद्यार्थी मिळावेत यासाठी संस्थेने माध्यमिक आश्रमशाळेला जोडून या प्राथमिक आश्रमशाळेला “विशेष बाब” म्हणून मान्यता मिळण्यासाठी दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या पत्राद्वारे प्रस्तावासह विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वरील संस्थेला प्राथमिक आश्रमशाळा (वि.जा.भ.ज.) सुरु करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) दिनांक ३१ मे, २००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजुर न करण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे सदरहू संस्थेस प्राथमिक आश्रमशाळा मंजुर करता येत नाही.

-----------------

## शासनाने कलाप्रकारांवर मानधनावर लागू केलेला जीएसटी कर कमी करण्याबाबत

**(४) * ३७६४१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कलाप्रकारांवर २८ टक्के तर मानधनावर १८ टक्के जीएसटी लागू केल्याने “संगीत कलाप्रकार” महागल्यामुळे कलाकार व संगीतप्रेमी नाराज असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी सर्व कलाप्रकारास ७ टक्के करमणूक कर होता व त्याचा परतावाही मिळत होता, परंतु शासनाने २८ टक्के जीएसटी लावल्याने १ हजार रुपयांच्या तिकीटाला २८० रुपये जीएसटी भरावा लागत असून उर्वरित ७२० रुपयांमध्ये कार्यक्रम आयोजक संस्थांना कलाकार, स्टेज सजावट, रंगमंच कर्मचारी आदी विविध खर्चामुळे आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने परंपरागत चालत आलेल्या कलाप्रकाराची जोपासना करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) जीएसटी अंतर्गत संगीत कलाप्रकाराच्या तिकीट दरावर १८% (९% सीजीएसटी + ९% एसजीएसटी) कर आकारणी होते. कलाकाराचे मानधन प्रति सादरीकरण रुपये १ लक्ष ५० हजार पेक्षा जास्त असल्यास त्यावर १८% जीएसटीची आकारणी होते.

(२) व (३) संगीत कलाप्रकारावर प्रवेश तिकीटाचा रुपये २५० प्रति व्यक्ती कर माफी असलेली सूट शासनाने दिनांक २५ जानेवारी, २०१८ पासून रुपये ५०० प्रति व्यक्ती तिकिटदरापर्यंत वाढविली आहे. त्यामुळे साधारणपणे संगीत कलाप्रकारावर आकारण्यात येणाऱ्या प्रवेश तिकिटावर जीएसटीची आकारणी केली जात नाही. सर्वसाधारण तिकिटावर जीएसटीची करमाफी असल्याने जीएसटीमुळे कार्यक्रम आयोजकास आर्थिक तोटा सहन करावा लागतो असे म्हणता येणार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत

**(५) * ३८९४८ श्री.कपिल पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय कर्मचारी, निमशासकीय कर्मचारी तसेच प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक यांना सातवा वेतन आयोग देण्यासंदर्भात शासनाने नियुक्त केलेल्या के.पी.बक्षी समितीने अद्‌याप कामकाज सुरु केले नसल्याचे राजपत्रित अधिकारी महासंघाच्या शिष्टमंडळाने मा.मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास माहे जानेवारी, २०१८ च्या दुसऱ्या आठवडयात आणून दिली तसेच पाच दिवसाचा आठवडा करण्यासंदर्भात बी.सी. खटुआ समितीने तयार केलेला अहवाल मा.मुख्यमंत्री महोदयांना सादर केला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६० वर्षे करण्यासंदर्भात खट्आ समितीने शिफारस केली आहे, आणि महिला कर्मचाऱ्यांना दोन वर्षाची बालसंगोपन रजा, अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनाही अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खट्आ समितीच्या शिफारशी काय आहेत, त्याबाबत शासनाचे धोरण काय आहे, सदर अहवालाच्या अनुषंगाने सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याबाबत निर्णय घेण्यात आल्यास सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे व उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यातील सर्व आस्थापनातील शासकीय कर्मचारी, निमशासकीय कर्मचारी आणि अनुदानित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विविध संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून सातत्याने करण्यात येणारी मागणी विचारात घेता सर्व कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासंबंधीची कार्यवाही केव्हापर्यंत पुर्ण होणार आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने शासनाने नियुक्त केलेल्या के.पी.बक्षी समितीचे कामकाज सुरु आहे. तसेच पाच दिवसाचा आठवडा करण्यासंदर्भात कोणतीही समिती शासनाने गठीत केलेली नाही.

(२) सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६० वर्षे करण्याच्या अनुषंगाने नियुक्त केलेल्या खट्आ समितीचा अहवाल लवकरच शासनास सादर होणे अपेक्षित आहे.

राज्य शासकीय मान्यताप्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कृषी व बिगर कृषी विद्यापीठे व त्यांना संलग्न असलेली महाविद्यालये यामधील पूर्णकालिक शिक्षक व शिक्षकेतर महिला कर्मचारी व पत्नी नसलेल्या पुरुष कर्मचाऱ्यास संपूर्ण सेवाकालावधीत काही अटी व शर्तींच्या अधिन राहून बालसंगोपन रजा अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनाही अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. त्यानुषंगाने प्रभावी उपाययोजना सुचविण्यासाठी मा.मंत्री, वित्त यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली असून सदर विषय समितीच्या विचारार्थ ठेवण्यात आला आहे. सदर मंत्रिमंडळ उपसमितीच्या ५ बैठका झाल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतन सुधारणेबाबत राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ (बक्षी समिती) कडे निवेदने करण्याकरीता शासनाच्या संकेतस्थळावर वेब पोर्टल कार्यान्वित केले आहे. निवेदने सादर केलेल्या सर्व संघटनांशी चर्चा करुन समिती आपला अहवाल शासनास सादर करणार आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर उचित निर्णय घेतला जाईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर विद्‌यापीठातील मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती प्रलंबित असल्याबाबत

**(६) * ३८८७३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर विद्‌यापीठातील एन.टी., ओ.बी.सी., एस.बी.सी. आणि एस.सी.प्रवर्गातील विद्‌यार्थ्यांना देण्यात येणारी शैक्षणिक शिष्यवृत्ती गेल्या तीन वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित असलेली शिष्यवृत्ती विद्‌यार्थ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) सन २०१३-१४ ते २०१५-१६ या आर्थिक वर्षामधील सोलापूर विद्यापीठातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची प्रलंबित देयके अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## वनरक्षक व वनपाल यांच्या विविध मागण्यांबाबत

**(७) * ३८७६६ अॅड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वन विभागातील वनरक्षक व वनपाल यांचेकडून जंगलाचे संरक्षण करण्याखेरीज पीडीए व जीपीएस हाताळणे, पॉलिगॉन तयार करणे, फिरतीचे टॅग घेऊन जलयुक्त शिवार व वनयुक्त शिवार कामांत जेग टॅनिंग करणे अशी अनेक तांत्रिक कामे करण्यात येत असल्याचे निवेदन उपवनसंरक्षक, जव्हार, वनसंरक्षक, ठाणे, प्रधान सचिव, महसूल व वने विभाग (वने) यांना महाराष्ट्र राज्य वनरक्षक वनपाल संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये व त्यादरम्यान सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच वनरक्षक व वनपाल हे तांत्रिक कर्मचारी नसल्याचे सांगून त्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यास चालढकल करीत असल्यामुळे राज्यात नवीन वर्षातील व्याघ्रगणनेला वनरक्षकांनी बहिष्कार टाकला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनामध्ये वनरक्षक व वनपाल यांच्या अन्यायकारक वेतनश्रेणी सुधार करुन प्रोत्साहन व आहारभत्ता मंजूर करणे, कर्तव्यावर असताना कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास रुपये २५ लाख मदत जाहीर करणे, वन्यजीव विभागासाठी विशेष भत्ता लागू करणे अशा विविध मागण्यांबाबत असहकार आंदोलन करण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्य वनरक्षक व वनपाल संघटनेने दिलेल्या सदर निवेदनाबाबत तसेच वनरक्षक आणि वनपालांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.

काही वनरक्षकांनी वन्यप्राणी गणना करताना, जीपीएस तसेच पीडीएचा वापर केलेला नाही व तांत्रिक कामे करण्यास बहिष्कार टाकलेला आहे असे कारण त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. परंतू सदर असहकार आंदोलन मागे घेतले आहे.
(३) सदर मागण्यांचा वनरक्षक/वनपाल संघटनेच्या निवेदनामध्ये समावेश आहे.
(४) वनरक्षक-वनपालांच्या वेतनश्रेणीच्या अनुषंगाने सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींचा सखोल अभ्यास करण्यासाठी राज्य शासनाने गठीत केलेल्या श्री.के.पी.बक्षी राज्य वेतन सुधारणा समिती २०१७ यांच्या समोर संघटनेस सादरीकरण करण्याबाबत कळविण्यात आले असून संघटनेच्या उर्वरीत मागण्यांबाबत कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ३५ महामंडळे बंद करण्याबाबत

**(८) * ३७७०६ श्री.प्रकाश गजभिये, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध भागांचा आणि अविकसित विभागांचा विकास व्हावा म्हणून राज्यात स्थापन करण्यात आलेल्या सुमारे ५५ महामंडळांपैकी ३५ महामंडळे तोट्यात चालत असल्याने सदर महामंडळे बंद करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१८ वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तोट्यात चालत असलेली महामंडळे कोणती, ती बंद करण्याची कारणे काय आहेत व त्यांचा तोटा किती आहे,

(३) तसेच महामंडळाची आर्थिक स्थिती पहाता ती चालविण्यापेक्षा बंद करण्यात यावीत असा सल्ला वित्त विभागाने शासनाला दिला असून याप्रकरणी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने महामंडळाच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेऊन आपला अहवाल शासनाला सादर केला आहे काय, अहवालाचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उक्त महामंडळाच्या अडचणी सोडवून पुनर्जिवीत करण्याबाबत तसेच या महामंडळातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) एकूण ५५ राज्य सार्वजनिक उपक्रमांपैकी तोट्यात चालत असलेली ३५ महांमडळे बंद करण्याचा निर्णय जानेवारी, २०१८ मध्ये घेण्यात आलेला नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) नाही. मात्र विविध प्रशासकीय विभागाच्या अखत्यारीतील तोट्यात चालत असलेल्या १७ राज्य सार्वजनिक उपक्रमांचा मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या दिनांक ०५/०४/२०१६ च्या बैठकीत आढावा घेण्यात आला. उच्चाधिकार समितीने या सार्वजनिक उपक्रमांनी त्यांचा संचित तोटा टप्प्याटप्प्याने कमी करुन नफ्यात येण्याबाबत उपाययोजना कराव्यात आणि जर नफ्यात येऊ शकले नाहीत तर संचित तोटा निरसित करुन ना-नफा ना-तोटा तत्वावर उपक्रम चालविण्याचा प्रयत्न करावा असे निदेश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विमुक्त जाती, भटक्या जमाती यांना क्रिमिलेअरमधून वगळण्याबाबत

**(९) * ३८९६९ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विमुक्त जाती, भटक्या जमाती यांना क्रिमिलेअरमधून वगळण्यात येईल असे आश्वासन या विभागाचे राज्यमंत्री यांनी माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मागासवर्ग आयोग यांनी स्वयंस्पष्ट अहवाल देवूनही या प्रस्तावावर जनतेच्या हरकती व सूचना मागविण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी ओबीसीसह विमुक्त जाती, भटक्या जमाती यांना क्रिमिलेअर मधून वगळण्यात येईल असे आश्वासन दिले व हे प्रकरण राज्य मागासवर्ग आयोगाकडे पाठविण्यात आले, हे खरे आहे काय,

(४) तसेच ओबीसींना यातून कायद्याने वगळताच येत नसतानाही शासन या प्रकरणावर वेळकाढूपणा करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विमुक्त जाती, भटक्या जमाती यांना क्रिमिलेअरमधून वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) व (३) राज्यातील विमुक्त जाती "अ" मध्ये समाविष्ट असलेल्या १४ जाती, भटक्या जमातीच्या यादी मधील समाविष्ट असलेल्या २३ व विशेष मागासवर्गातील अनुक्रमांक ७ वरील १ अशा एकूण ३८ जाती क्रिमिलेअर तत्वामधुन वगळता येऊ शकेल अशी शिफारस राज्य मागासवर्ग आयोगाने राज्य शासनाकडे केली आहे. राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदरहू शिफारशीवर जनतेच्या सूचना व हरकती मागविण्यात आल्या आहेत.

(४) नाही.

(५) या प्रकरणी जनतेकडून प्राप्त झालेल्या हरकती तसेच, विजाभज, इमाव व विमाप्र यामधील सर्व प्रवर्गाच्या जातींना क्रिमिलेअर तत्वातून वगळता येईल किंवा कसे, याबाबत अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्प, वडवणी (ता.वडवणी, जि.बीड) सांडव्यावरून वाहून जाणाऱ्या पाण्याबाबत

**(१०) * ३७८५८ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्प, वडवणी (ता.वडवणी, जि.बीड) या प्रकल्पाच्या मूळ मान्यता प्रकल्प अहवालानुसार प्रकल्प व यावरील योजना यांचा एकूण पाणी वापर २४.४९ द.ल.घ.मी. आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धरणस्थळापर्यंत एकूण पाणलोट क्षेत्र १०५.६७ चौरस मैल असून यामध्ये पाणी आवक ५३.०७ द.ल.घ.मी. आहे, यामुळे प्रकल्पातील पाणी वापराशिवाय ३१.५८ द.ल.घ.मी. सांडव्यावरून वाहून जाते तसेच उक्त प्रकल्पातील सांडव्यावरून वाहून जाणारे पाणी बोगद्याद्वारे मैंदा ता.बीड तलावात वळविल्यास पिंपळनेर, केसापुरी, परभणी, घाटसाळवीसह परिसरातील पंचवीस हजार एकर जमिनीस सिंचनाचा लाभ मिळू शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सतत अवर्षणप्रवण भागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ देण्यासाठी शासनाने कार्यवाही करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त पाणी अवर्षणप्रवण भागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ देण्यासाठी तसेच कामाचे अंदाजपत्रक आणि सर्वेक्षण करून त्यास मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्प ता.वडवणी जि.बीड या प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पाचा एकूण पाणी वापर १७.७९७ दलघमी आहे.

(२) उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पांतर्गत धरण स्थळापर्यंतचे एकूण पाणलोट क्षेत्र १०५.६७ चौ.मैल असून प्रकल्पस्थळी मूळ प्रकल्प अहवालाप्रमाणे एकूण पाणी आवक ५०.३३ दलघमी आहे. यापैकी उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पाकरिता पाणी वापर १७.७९७ दलघमी प्रस्तावित असून उर्वरित ३२.५३३ द.ल.घ.मी. पाणी या योजनेच्या खालील बाजूस असलेल्या माजलगाव प्रकल्प, कुंडलिका मध्यम प्रकल्प उपळी, ता.धारुर, जि.बीड व इतर योजनांकरिता प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत नवीन योजनेसाठी पाणी उपलब्ध नाही.

(३) नाही. तथापि, लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५/०१/२०१८ रोजीच्या मा.मंत्री, जलसंपदा यांना लिहिलेल्या पत्रान्वये सदर विषयांकित बाबतची मागणी केलेली आहे.

(४) सदर पत्रातील मागणीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना शासनाच्या दिनांक ०८/०२/२०१८ रोजीच्या पत्राने देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यातील आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालयांमध्ये पुरेसे अध्यापक तसेच पायाभूत सुविधा नसल्याबाबत

**(११) * ३७८३९ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालयांमध्ये पुरेसे अध्यापक तसेच पायाभूत सुविधा नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालयांमध्ये पुरेसे अध्यापक तसेच पायाभूत सुविधा नसल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) तसेच, आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालयांमध्ये पुरेसे अध्यापक व पायाभूत सुविधा नसल्यामुळे सर्व आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालयांची अचानक तपासणी करुन ज्या महाविद्यालयांमध्ये त्रुटी असतील त्यांची मान्यता रद्द करण्याची कारवाई करण्याचे आदेश सचिव, वैद्यकिय शिक्षण विभाग यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर आदेशानुसार किती आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालये दोषी आढळून आले आहेत व किती महाविद्यालयाची मान्यता रद्द केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अध्यापक व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) व (२) होय हे खरे आहे.

शासनाने दिनांक ०९/१०/२०१७ च्या परिपत्रकान्वये आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालयांचे परिणामात्मक मुल्यांकन करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीची थकीत रक्कम केंद्र शासनाकडून मिळण्याबाबत

**(१२) * ३८८८२ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी राज्य शासनाला सन २००१ ते २०१७ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडून रुपये २ हजार ५७६ कोटी ५१ लाख येणे असल्याचे सन २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिष्यवृत्तीची थकीत रक्कम केंद्र शासनाकडून मिळावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना ही १००% केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेकरीता सन २०१७-१८ साठी केंद्र सरकारकडून रुपये ५८.४४ कोटी निधी प्राप्त झाला आहे.

केंद्र सरकारने सदर योजना फंन्ड लिमिटेड करण्याचा निर्णय दिनांक ११/०८/२०११ च्या पत्रान्वये घेतला आहे.

तरी देखील केंद्र सरकारकडून या योजनेंतर्गत प्रलंबित निधीसह सन २०१७-१८ करीता आवश्यक निधी प्राप्त करुन घेण्याकरिता दिनांक १२/०९/२०१७ च्या प्रस्तावान्वये केंद्र सरकारला विनंती करण्यात आलेली आहे.

-----------------

## वाघ नदीवरील (जि.पालघर) धरणाचे काम अपूर्ण स्थितीत असल्याबाबत

**(१३) * ३८९४० श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात शासनाच्या लघु पाटबंधारे स्थानिकस्तर विभागाकडून सन १९९४-९५ मध्ये वाघ नदीवर पळसपाडया जवळ करोडो रुपये खर्च करुन मोठे धरण बांधण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरणाच्या दुरुस्तीच्या नावाखाली धरणाच्या पाठांचे काम अर्धवट असल्यामुळे मोखाडयातील गाव पाडे अजूनही पाण्यापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मोखाडा गावात व आजूबाजूच्या पाडयांना पाण्याचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

वाघ नदीवर पळसपाड्याजवळ नसून वीसपाड्याजवळ वाघ लघु पाटबंधारे या राज्यस्तरीय योजनेचे काम प्रगतीपथावर असून धरणाचे काम पूर्ण झाले आहे.
(२) अंशत: खरे आहे.

योजनेचा डावा कालवा पूर्ण असून उजवा कालवा ९० टक्के पूर्ण आहे. उजव्या कालव्यावर साखळी क्रमांक ७८९२ ते साखळी क्रमांक ८६९० यास ग्रामस्थांनी विरोध केल्यामुळे त्या भागातील पर्यायी संरेखेवरील कालव्याचे काम प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत ५१० हेक्टर सिंचनक्षेत्रापैकी महत्तम १५६ हेक्टर प्रत्यक्ष सिंचन झालेले आहे. सदरचा प्रकल्प हा जून, २०१८ पर्यंत निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करून मोखाडा तालुक्यातील सर्व क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजित आहे.
(३) प्रकल्पाच्या कालव्याची उर्वरित कामे प्रगतीपथावर असल्याने प्रश्न उद्भवत नाही. ही पाणीपुरवठा योजना नाही. तथापि प्रकल्प अहवालातील तरतूदीनुसार पिण्यासाठी ०.१७३ दक्षलक्ष घन मीटर पाणी राखीव ठेवण्यात आले आहे. अद्याप पिण्याच्या किंवा औद्योगिक वापरासाठी पाण्याची मागणी आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सेंट जॉर्ज या शासकीय रुग्णालयात सिटीस्कॅन मशीन वापराविना पडून असल्याबाबत

**(१४) * ३७७८८ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेंट जॉर्ज रुग्णालय प्रशासनाने शासनाकडे अनेक वर्षे सातत्याने पाठपुरावा करून माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये ७ कोटी रुपयांची जर्मनीहून अत्याधुनिक सेवा सुविधांनीयुक्त अशी सिटीस्कॅन मशीन सेंट जॉर्ज रुग्णालयाला उपलब्ध करून दिली, हे खरे आहे काय,
(२) तसेच सेंट जॉर्ज रुग्णालयात सिटीस्कॅनची सेवा उपलब्ध नसल्याने या रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना सिटीस्कॅन करण्यासाठी जे.जे. रुग्णालय अथवा जी.टी. रुग्णालयात पाठविण्यात येत असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये सेंट जॉर्ज रुग्णालयात दाखल झालेली सिटीस्कॅन मशीन मागील सुमारे एक वर्षापासून वापराविना पडून आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आजमितीस सदरहू सिटीस्कॅन मशीन कार्यान्वित न होण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सेंट जॉर्ज रुग्णालयात औषधोपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची सिटीस्कॅन अभावी होणारी गैरसोय विनाविलंब दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) नाही.
(४) विहीत निविदा प्रकियेअंती सेंट जॉर्ज रुग्णालयासाठी सिटीस्कॅन यंत्र खरेदी करण्यास मार्च, २०१७ मध्ये शासन आदेश निर्गमित करण्यात आले होते. सदर यंत्रसामुग्री टर्न की तत्वावर असल्याने, सदर यंत्रसामुग्री सप्टेंबर, २०१७ मध्ये प्रस्थापित करण्यात आली. सदर यंत्रसामुग्री रूग्णसुरक्षेच्या दृष्टीने कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक त्या विद्युत विषयक कामांची आवश्यकता आहे. त्याबाबत रुग्णालय प्रशासनामार्फत बेस्टकडे (BEST) पाठपुरावा सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील वनमजुरांची मंजूर पदे नियमित करण्याबाबत

**(१५) * ३८२७५ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वनमजुरांची ५०८९ पदे मंजूर असून त्यामध्ये ४०६ पदे यवतमाळ वन विभागातील आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील वनमजुरांची ४०६ मंजुर पदांपैकी १५४ पदे सन २०१२ मध्ये शासनाने नियमित केली असून उर्वरित वनमजुरांना नियमित केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वनमजुरांची मंजूर पदे नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२), (३) व (४) यवतमाळ वनविभागातील शासन निर्णय दिनांक १६/१०/२०१२ मधील तरतूदीनुसार पात्र ठरलेल्या १५३ वनमजुरांना नियमित केलेले आहे.

तसेच ज्या मजूरांनी वयाची ६० वर्ष पूर्ण करणे/काम सोडून जाणे/ मृत्यू होणे/ फौजदारी गुन्हा दाखल असलेले व रोजगार हमी योजने सारख्या तत्सम योजनेवर काम करीत असलेले २५३ मजुर शासन निर्णय दिनांक १६/१०/२०१२ मधील तरतूदीनुसार पात्र ठरत नसल्याने त्यांना नियमित करता आले नाही.

-----------------

## पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गिरणा खोऱ्यात वळविण्याबाबत

**(१६) * ३७८६३ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५०९७ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नार-पार, औरंगा, अंबिका, दमणगंगा या पश्चिमवाहिन्यांचे पाणी गिरणा खोऱ्यात वळविण्याबाबतच्या योजनेचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे प्रगतीपथावर असलेले काम पुर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेतील धरणांसाठी करावयाचे अन्वेषण वन विभागाच्या हद्दीत असल्याने त्यासाठी आवश्यक वन विभागाची परवानगी घेण्याची कार्यवाही सामंजस्य करारानुसार WAPCOS LTD., नवी दिल्ली यांनी करावयाची असून त्यांचेमार्फत सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय व सदरील वन विभागाकडील परवानगी प्राप्त झाली आहे काय,

(३) नसल्यास, सदरील सर्वेक्षण व अन्वेषण त्याचप्रमाणे वन विभागाकडील परवानगी घेण्याची कार्यवाही केंव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही, सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) नाही.

(३) वनविभागाच्या परवानगीसह योजनेचे सर्वेक्षण व अन्वेषण माहे मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## पुणे जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास व पारधी समाजाचे आवास योजनेची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१७) * ३८१८१ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेची सन २०१६-१७ या वर्षात ८१६३ घराचे उद्दिष्ट असताना केवळ १३३८ कामे पूर्ण झाली असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे जिल्ह्यात पारधी आवास योजनेसाठी सन २०१६-१७ या वर्षात ६६ घराचे उद्दिष्ट असताना केवळ २२ घराचे बांधकाम पूर्ण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुणे जिल्ह्यातील आवास व पारधी समाजाचे आवास योजनेची कामे पूर्ण क्षमतेने होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय निर्मितीस विलंब होत असल्याबाबत

**(१८) * ३८५११ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय निर्मितीस विलंब होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निर्मितीसाठी कृती आराखडा व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी रुग्णालयांकडून रुग्णांची आर्थिकदृष्टया लूट होत असल्याबाबत

**(१९) * ३७७३९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक ३५०५१ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी रुग्णालयांकडून अवास्तव बील आकारणी होत असून गोरगरीब रुग्णांची लूट होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली असून गोरगरीब रुग्णांची होणारी लूट रोखण्यासाठी तसेच रुग्णालयाच्या कारभारावर कायदेशीर अंकुश आणण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे व तद्‌नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, निर्णय घेण्यात आला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व यासंदर्भात सध्या कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) वैद्यकीय आस्थापना विधेयक-२०१४ चा मसूदा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून सदर विधेयक राज्यात लागु करण्यापूर्वी विधेयकातील तरतूदींवर संबंधित क्षेत्रातील व्यक्ती

वा संस्थांचे स्पष्ट अभिप्राय जाणून घेण्यासाठी उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८/०१/२०१८ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीत खाजगी रुग्णालयाचे प्रतिनिधी, भारतीय वैद्यकीय संघटनेचे प्रतिनिधी, आयएमएचे प्रतिनिधी, पॅथॉलॉजिकल लॅबचे प्रतिनिधी इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे. सदर समितीने त्याबाबतचा अहवाल शासनास सादर केल्यानंतर त्यानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोंडगे (खोरगांव), कुरंग (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील प्रकल्पाचे काम बंद असल्याबाबत

**(२०) * ३८३३३ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कोंडगे (खोरगांव), कुरंग (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथे सन २०१२-२०१३ मध्ये धरण (लघु पाटबंधारे) प्रकल्प मंजूर करुन काम सुरु केले असून माहे जून, २०१४ पासून दोन्ही प्रकल्पाचे काम बंद असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही प्रकल्पांकरीता भूसंपादन केलेल्या बाधित शेतकऱ्यांना अद्याप मोबदला मिळाला नसून सदर प्रकल्पाचे स्वरुप (उंची, पाणी साठवणक्षमता) व कालव्यांची स्थिती कशाप्रकारे असणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बाधित शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच प्रकल्पाचे काम सुरु करुन किती कालावधीत पूर्ण होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

कोंडगे ल.पा. योजनेस दिनांक ३०/०८/२०११ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली असून दिनांक ०४/०४/२०१३ रोजीच्या कार्यारंभ आदेशानुसार कामास सुरुवात करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत प्रकल्पाचे काम बंद नाही.

कुरंग ल.पा. योजनेस दिनांक ३०/०८/२०११ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली असून दिनांक २२/०८/२०१४ रोजीच्या कार्यारंभ आदेशानुसार कामास सुरुवात करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत प्रकल्पाचे काम बंद नाही.

(२) कोंडगे ल.पा. योजना - भूसंपादनाचा अंतिम निवाडा जाहीर झाल्यानंतर उपविभागीय अधिकारी, राजापूर यांचे मागणीनुसार उर्वरीत रक्कम निधीच्या उपलब्धतेनुसार वर्ग करण्यात येईल. योजनेच्या धरणाची महत्तम उंची ३३.५४ मी. असून पाणीसाठा २४१२ स.घ.मी. आहे. या योजनेसाठी पारंपारिक कालवा वितरण प्रणाली ऐवजी नलिकेद्वारे पाण्याचे वितरण करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

कुरंग ल.पा. योजना-ग्रामस्थांच्या मागणीनुसार कुरंग पाझर तलावाचे लघु पाटबंधारे योजनेमध्ये रुपांतर करण्यात आले. ल.पा. योजनेमुळे अतिरिक्त जमिनीच्या नविन भूसंपादन कायदा सन २०१३ अन्वये भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना सादर केला आहे.

योजनेच्या धरणाची महत्तम उंची ३०.३७ मी. असून पाणीसाठा २१२४ स.घ.मी. आहे. या योजनेसाठी पारंपारिक कालवा वितरण प्रणाली ऐवजी नलिकेद्वारे पाण्याचे वितरण करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यामध्ये नवीन व नियमित अंगणवाडी केंद्रांना मंजुरी देण्याबाबत

**(२१) * ३७६८१ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुक्ष्म सर्वेक्षण करून नवीन व नियमित अंगणवाडी केंद्रांसाठी प्रस्ताव पाठविण्याबाबत आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी दिलेल्या निदेशानुसार नाशिक जिल्हा परिषदेने दिनांक २१ एप्रिल, २०१४ रोजी शासनास सादर केलेले प्रस्ताव माहे जानेवारी, २०१८ पर्यंत प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रस्ताव मंजुरीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने प्रस्ताव मंजूर करून नाशिक जिल्ह्यामध्ये नवीन व नियमित अंगणवाडी केंद्रांना मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) आयुक्तालयाचे पत्र क्र.एबाविसेयो/का-४/९२३/१६, दिनांक १६/०३/२०१६ अन्वये नाशिक जिल्ह्यासाठी नियमित अंगणवाडी केंद्र वगळता ७५ मिनी अंगणवाडी केंद्रांना मंजुरी देण्यात आली आहे.

नाशिक जिल्ह्यासाठी ३ नवीन बाल विकास प्रकल्प व ८९ अतिरिक्त अंगणवाडी मंजूरीसाठीचा प्रस्ताव आयुक्तालयाचे पत्र क्र. ICDS/D-४/१५-१६/७१५, दिनांक ०२/०३/२०१६ अन्वये केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभाग, नवी दिल्ली यांना सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यातील अंगणवाडीच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२२) * ३८७२९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३५३९७ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील १२०४ गावात ३३५६ अंगणवाडया कार्यरत असून त्या अंगणवाडयांमध्ये ० ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना पुरक पोषण आहार देऊन कुपोषण रोखणे तसेच गर्भवती माता व किशोरवयीन मुलींना आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्ह्यातील ३३५६ अंगणवाडयापैकी २४२५ अंगणवाडयांना स्वत:च्या इमारती असून ८०० अंगणवाडया भाड्याच्या जागेत सुरु असून तेथे त्यांना शौचालय, स्वतंत्र स्वयंपाक घर आरोग्य इ.सोयी सुविधा उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ८०० अंगणवाडयाच्या बांधकामासाठी रुपये ४८ कोटीचा निधीचा प्रस्ताव आयुक्त, एकात्मिक बालविकास यांचेकडे पाठविण्यात आला असून त्यावर कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अंगणवाडयांना आवश्यक त्या सोईसुविधा व बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) औरंगाबाद जिल्ह्यात एकूण ३५०६ अंगणवाडी केंद्र मंजूर आहेत. ३५०६ अंगणवाडयांमध्ये ० ते ३ वर्षे वयोगटातील बालकांना पूरक पोषण आहार देऊन कुपोषण रोखण्याचा तसेच गर्भवती माता व किशोरवयीन मुलींना आरोग्य विषयक मार्गदर्शन मिळण्याच्यादृष्टीने अंगणवाडया कार्यरत आहेत.

(२) औरंगाबाद जिल्हयात ३५०६ अंगणवाडयापैकी २४५२ अंगणवाडयांना स्वत:च्या इमारती असून २५० अंगणवाडया बांधण्यासाठी सरकारी जागा उपलब्ध होत नसल्याने भाडयाच्या जागेवर चालविल्या जात असून उर्वरित अंगणवाडी केंद्र शेजारची जिल्हा परिषद शाळेची खोली, समाजमंदिर, ग्रामपंचायत, इत्यादी ठिकाणी भरविण्यात येतात. त्याठिकाणी शौचालय व आरोग्य सुविधा, इत्यादी सुविधा पुरविल्या जातात.
(३) शासकीय जागा उपलब्ध असलेल्या ठिकाणी अंगणवाडी इमारत बांधकामासाठी प्रस्ताव प्राप्त झाला आहे. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत नवीन अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम घेण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनास आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे स्तरावरुन सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच जिल्हा नियोजन व विकास परिषद अंतर्गत प्राप्त होणाऱ्या तरतूदीमधून अंगणवाडी केंद्र इमारत दुरुस्तीची कामे घेण्याबाबत शासनाने दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार धोरण निश्चित केलेले आहे.
(४) महिला व बाल विकास विभाग यांचे दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार सन २०१७-१८ पासून जिल्हा नियोजन व विकास परिषद अंतर्गत नवीन अंगणवाडी बांधकामासाठी ५०% व जुन्या अंगणवाडीसाठी तसेच ज्या अंगणवाडीत शौचालये नाहीत तेथे शौचालये बांधण्यासाठी ५०% प्रमाणे निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील हजारो व्यापाऱ्यांकडे थकित असलेल्या विक्रीकराची वसुली करण्याबाबत

**(२३) * ३९०९१ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हजारो व्यापाऱ्यांकडे २ हजार ८६० कोटी १८ लाख रुपयांचा विक्रीकर थकित असून यातील काही व्यापारी आपला उद्योग-व्यवसाय बंद करुन बेपत्ता झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेपत्ता व्यापाऱ्यांचे नवे लोकेशन शोधण्यासाठी पोलीस, महसूल व नगरविकास विभागाला विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी विक्रीकर विभागाला उक्त विभागाकडून कोणती मदत करण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोर्षीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार** : (१) होय. विक्रीकर विभागांतर्गत लापता व्यापाऱ्याकडून दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजीची प्रलंबित असलेली वसूली रुपये २८६०.१६ कोटी होती.
(२) होय.
(३) वसुली प्रलंबित असलेल्या काही प्रकरणात व्यापारी व्यवसायाचे ठिकाण सोडून गेल्यामुळे व त्याचा नवीन व्यवसायाचा ठावठिकाणा सापडत नसल्याने प्रलंबित थकबाकीची वसूली होण्यासाठी अडचणी निर्माण झालेल्या आहेत. अशा ५ लाखापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या सर्व प्रकरणात आयकर विभागाशी संपर्क साधून प्रलंबित थकबाकीच्या वसूलीसाठी व्यापाऱ्याचे अद्ययावत बँक खाते व इतर तपशील मिळविण्यासाठी विक्रीकर विभाग प्रयत्न करीत आहे. बेपत्ता व्यापाऱ्यांच्या बाबतीत नजीकचे पोलीस स्टेशन, पोस्ट ऑफिस, कंपनी रजिस्ट्रार यांचे अभिलेख, इंटरनेट इत्यादी ठिकाणी तपासणी करुन व्यापाऱ्यांच्या उपलब्धतेबाबत खातरजमा करण्याचे विक्रीकर अधिकाऱ्यांना निर्देश दिलेले आहेत. तसेच ज्या ठिकाणी अगोदर व्यापाऱ्यांचा व्यवसाय चालू होता, त्या जागेच्या बाबतीत तहसिलदार अथवा तलाठी यांचे अभिलेख, नगरपालिका अथवा महानगरपालिका यांचा मालमत्ता विभाग तसेच सब रजिस्ट्रार यांचे अभिलेख इत्यादींकडे चौकशी करुन व्यापाऱ्यांचे ठावठिकाणा व मालमत्ता शोधण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(४) वसुली प्रलंबित असलेल्या प्रकरणामध्ये व्यापाऱ्याच्या बँक खाते व मालमत्तेवर टाच आणण्यात येते व त्यामधून थकबाकीची वसूली करण्यात येते. व्यापाऱ्यांच्या ऋणकोकडून देय असलेल्या रक्कमही वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाला निधी देण्याबाबत

**(२४) * ३९१०१ श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक ३५१५४ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाला विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय मागासवर्ग महामंडळाकडून वर्षाला २५ कोटी रुपयांचा निधी दिला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील दोन वर्षापासून दोन कोटी इतकाच निधी दिला असून निधी कमी मिळाल्याने महामंडळाच्या सहा योजना बंद झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) राष्ट्रीय महामंडळाकडून मागील दोन वर्षात निधी प्राप्त झालेला नाही. तथापि, यापुर्वी राष्ट्रीय महामंडळाकडून प्राप्त झालेल्या निधीतील शिल्लक रक्कमेतून मागील दोन वर्षात लाभार्थ्यांना कर्ज वाटप करण्यात आलेले आहे.

(३) राष्ट्रीय मागासवर्ग महामंडळाच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाकडून विविधस्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाचल, विलये, जवळेथर (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) गावातील रस्ते मुख्यमंत्री ग्रामीण सडक योजनेतून करण्याबाबत

**(२५) * ३८९०० श्रीमती विद्‌या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचल, विलये, जवळेथर (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) गावातील रस्त्यांवर खड्डे झाल्यामुळे सदर रस्ते मुख्यमंत्री ग्रामीण सडक योजनेतून करण्यात यावेत, असे निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनातील मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, इतर जिल्ह्यांपेक्षा रत्नागिरी जिल्ह्याला मुख्यमंत्री ग्रामीण सडक योजनेतून कमी निधी देऊनही सन २०१७-१८ मध्ये कमी खर्च झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) सदरचे निवेदन आढळून येत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात जननी शिशु सुरक्षा योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(२६) * ३८६४० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माता मृत्यू व बालमृत्यूंचा दर घटविण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत जननी शिशु सुरक्षा योजना माहे ऑक्टोबर, २०१२ पासून लागू करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतानाही सन २०१६-१७ या वर्षात राज्यभरात मातामृत्यूंचा आकडा १ हजार ३५८ पेक्षा जास्त झाल्याची नोंद आरोग्य विभागात झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच आरोग्य विभागाशी संबंधित २३ जिल्हा रुग्णालयात या योजनेची अंमलबजावणी होत असताना मात्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात प्रसूतीसाठी आलेल्या महिलेच्या नातेवाईकांना शस्त्रक्रियेची साहित्य आणि औषधे खाजगी मेडिकल स्टोअर्स मधून विकत घेण्याचे प्रिस्क्रिप्शन दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मातामृत्यू व बालमृत्यूंवर नियंत्रण आणण्यासाठी व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयात सदर योजना राबविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

जननी शिशु सुरक्षा ही योजना राज्यात दिनांक ७ ऑक्टोबर, २०११ पासून सुरु केली आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१६-२०१७ मध्ये १२२९ मातामृत्यू झाले असून सन २०११-२०१२ च्या तुलनेत सन २०१६-२०१७ मध्ये मातामृत्यूंच्या संख्येत २१७ अंकांनी घट झालेली आहे.

(३) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये आलेल्या महिलांच्या नातेवाईकांना शस्त्रक्रियेचे साहित्य आणि औषधे खाजगी मेडिकल स्टोअर्स मधून विकत घेण्याचे प्रिस्क्रिपशन दिले जात नाही. तसेच प्रसूतीसाठी आलेल्या महिलांना या योजनेंतर्गत मोफत उपचार दिले जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मराठवाडयातील जलयुक्त शिवाराचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२७) * ३९१०५ श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयात सुरु असलेल्या जलयुक्त शिवाराचे कामास विलंब होत असल्यामुळे अनेक जलयुक्त शिवाराचे काम अपूर्णच राहिल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जलयुक्त शिवाराचे काम जलदगतीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## नागपूर पेंच व्याघ्र प्रकल्पातील वन खात्याच्या पथकास मारहाण झाल्याबाबत

**(२८) * ३८९१६ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत वाघ शिकार प्रकरणातील आरोपींना पकडण्यासाठी गेलेल्या वन खात्याच्या पथकास गावातील रहिवाशांकडून मारहाण झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार** : (१) हे खरे आहे.

पेंच व्याघ्र प्रकल्पातील वाघ शिकार प्रकरणातील वनगुन्हा क्रमांक ६७/१, दिनांक २६/०६/२०१७ मधील श्री.विजय जानराव गेडाम, रा. कोलितमारा व इतर ६ आरोपींना पकडण्याकरिता दिनांक २१/१२/२०१७ रोजी वनअधिकारी व कर्मचारी गेले असता गावातील महिलांनी आरोपींना पळून जाण्यास मदत केली. वन अधिकारी व कर्मचारी गावाबाहेर जात असतांना रस्त्यावर आडवे होवून रस्ता रोखून ठेवला. अधिकारी व कर्मचाऱ्यांसमोर स्वत:ला जाळुन घेण्याची धमकी दिली.

(२) सहाय्यक वनसंरक्षक (अशिप्रक) पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांनी क्षेत्र सहाय्यक, पवनी यांचे मार्फत दिनांक २२/१२/२०१७ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

वनगुन्हा क्रमांक ६७/१, दिनांक २६/०६/२०१७ प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कवठे यमाई (ता.शिरुर, जि.पुणे) येथील घोड नदीवरील बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२९) * ३८७८२ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवठे यमाई (ता.शिरुर, जि.पुणे) येथील घोड नदीवर असलेल्या फत्तेश्वर बंधाऱ्यावरील रस्त्यावर खड्डे पडून बंधाऱ्याच्या दोन्ही बाजुकडील कठडे तुटल्याने बंधाऱ्यातुन पाण्याची गळती सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंधाऱ्यावरुन शालेय विद्यार्थी, दुधगाड्या, दुचाकी व अवजड वाहनांची वाहतुक होत असल्याने बंधारा केव्हाही कोसळून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असल्याने शासनाने सदर बंधाऱ्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.
(२) होय.

तथापि, सदर बंधारा सार्वजनिक वाहतुकीसाठी संकल्पित नाही.
(३) सदर बंधाऱ्याची क्षेत्रियस्तरावर पाहणी केली असून बंधाऱ्याचे दुरुस्तीसाठी विशेष दुरुस्ती अंतर्गत अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रियस्तरावर प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) येथील प्रति महाबळेश्वर पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याबाबत

**(३०) * ३८९८० श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) येथील प्रति महाबळेश्वर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्थळास पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रति महाबळेश्वर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पर्यटन स्थळाला “क” दर्जा प्राप्त करुन देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) व (२) जिल्हाधिकारी,ठाणे कार्यालयामार्फत जव्हार या पर्यटन स्थळास "क" वर्ग दर्जा देण्यात आला आहे. तसेच जव्हार परिसरातील पर्यटन स्थळाच्या विकासासाठी सन २०१५-२०१६ मध्ये ५ कामांना, सन २०१६-२०१७ मध्ये २ कामांना व सन २०१७-२०१८ मध्ये एका कामाला निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकिय महाविद्यालये व रुग्णालयांना औषधांचा पुरवठा करण्याबाबत

**(३१) * ३८७११ श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १६ शासकीय वैद्यकिय महाविद्यालये व त्यांच्याशी संलग्न असलेल्या रुग्णालयांना औषधांचा पुरवठा सुरळीत होण्यासाठी औषध खरेदीच्या प्रचलित धोरणाशिवाय महिनाभर काही सवलती देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयात कोणत्या अटी व शर्ती घालण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, या निर्णयामुळे राज्यातील सर्व रुग्णालयात नियमित व वेळेवर औषध पुरवठा होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

(२) औषधीविषयक बाबींच्या संपुष्टात आलेल्या दरकरारांना दिनांक ३१/०१/२०१८ पर्यंत किंवा हाफकिन महामंडळाकडून सुरळीत पुरवठा होईपर्यंत यापैकी अगोदर जे घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती.

(३) होय.

(४) सद्य:स्थितीत सर्व रुग्णालयांमध्ये औषधाचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

-----------------

## नागपूर शहरातील कामगार रुग्णालयात सोनोग्राफी मशीनचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत

**(३२) * ३८१०४ श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील कामगार रुग्णालयाने प्रस्तावित केलेल्या नवीन सोनोग्राफी मशीनचा प्रस्ताव दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात सोनोग्राफी मशीन नसल्यामुळे रुग्णांना खाजगी रुग्णालयाशी करार करून तिकडे पाठविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सोनोग्राफी मशीनचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

नवीन सोनोग्राफी मशीन खरेदी होईपर्यंत रुग्ण सेवेत अडथळा निर्माण येऊ नये, यासाठी खाजगी संस्थेशी CGHS दराने करार करुन सोनोग्राफी करण्यात येते.

(३) सदर सोनोग्राफी मशीनची खरेदी ही हाफकीन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. मार्फत खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बालमृत्यू रोखण्याबाबत

**(३३) * ३९१९० श्री.मोहनराव कदम, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभाग आणि एकात्मिक बालविकास योजनेच्या अहवालानुसार सन २०१६-१७ या वर्षात १४ हजार ३६५ बालमृत्यू झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे बालमृत्यू सार्वजनिक आरोग्य, आदिवासी विकास आणि महिला व बालविकास विभागांशी संबंधित असून ते रोखण्यासाठी शासनास अपयश येत असल्याचे एकात्मिक बालविकास योजनेच्या अहवालातून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अहवालानुसार ७८ हजार ४३२ बालके धोकादायक अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील बालमृत्यू, अर्भक मृत्यू, मातामृत्यू, कुपोषण हे जिल्हा रुग्णालयात नसलेल्या मुलभूत सोयी-सुविधा आणि आरोग्य सेवेतील रिक्त पदे यामुळे झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील बालकांमधील कुपोषण, बालमृत्यू, अर्भक मृत्यू, मातामृत्यू रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये प्रति १००० जिवंत बालकांच्या जन्मामागे अर्भक मृत्यूदर हा सन २००८ सालातील ३३ वरून कमी होऊन १९ वर आलेला आहे. या वरून राज्यातील बालमृत्यू दरामध्ये घट झाल्याचे दिसून येत आहे.

(४) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालयासाठी १४ विशेषज्ञ सेवा मंजूर आहेत. याव्यतिरिक्त बालमृत्यू/अर्भक मृत्यूला आळा घालण्याच्या उद्देशाने विशेष नवजात काळजी कक्ष, फोटोथेरपी युनिट, ऑक्सिजन हुड, रेडियंट वॉर्मर, लॅरिगोस्कोप, इंडोट्रकीयेल टयुब्स, नेजल कॅन्युला बॅग, मास्क, वेईंग स्केल इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.

(५) राज्यामध्ये सन २०१०-१२ व सन २०११-१३ या वर्षामध्ये माता मृत्यूदर अनुक्रमे ८७ व ६८ आहे. यावरुन माता मृत्यू दरामध्ये घट झाल्याचे दिसून येते.

राज्यामध्ये मातामृत्यू, बालमृत्यू व कुपोषण कमी करण्यासाठी पुढील उपाययोजना राबविण्यात येत आहेत :-

- गरोदरपणातील संपूर्ण तपासणी व उपचार, संस्थात्मक प्रसुती, जननी शिशू कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, नियमित लसीकरण, नवजात काळजी कक्ष, नवजात स्थिरीकरण कक्ष, विशेष नवजात काळजी कक्ष, एचबीएनसी व इन्टेसीफाईड एचबीएनसी, जीवनसत्व अ व जंतनाशक मोहिम, बालउपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र, मानव विकास कार्यक्रम, नवसंजीवनी कार्यक्रम, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम इत्यादी.

- एकात्मिक बाल विकास सेवेंतर्गत अंगणवाडयांमधील ० ते ६ वयोगटातील बालके, गर्भवती, स्तनदा माता, किशोरवयीन मुली यांना - १) पुरक पोषण आहार २) आरोग्य तपासणी ३) संदर्भ सेवा ४) अनौपचारीक पूर्व शालेय शिक्षण ५) लसीकरण ६) आहार व आरोग्य इत्यादी सेवा नियमित देण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: मुंबई येथील समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांच्या सुरक्षतेसाठी अत्यावश्यक यंत्रणा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३४) * ३८११७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई येथील समुद्रात पर्यटक, मुले बुडून मरण पावल्याच्या घटना होत असून पर्यटकांचा निष्काळजीपणा व अपुरी सुरक्षा व्यवस्थेमुळे चौपाटया जीवघेण्या ठरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौपाटया, समुद्रकिनारी पर्यटकांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी वॉच टॉवर, मेगाफोन, फ्लडलाईट देखरेख यंत्रणेच्या अभावामुळे या दुर्घटनांवर नियंत्रण ठेवता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईसह राज्यातील समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी पोहण्याच्या साधनांशिवाय प्रथमोपचाराची साधने, जीवरक्षकांसाठी ठराविक कालावधीनंतर प्रशिक्षण त्यांचे मनोधैर्य कायम राखण्यासाठी पुरेशी काळजी घेणे, किनाऱ्यांजवळ रुग्णवाहिका तैनात करणे, वॉकीटॉकीची सोय अशा गोष्टींचीही उपलब्धता करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) मुंबईसह राज्यात समुद्रात बुडून मरण पावण्याच्या घटना घडलेल्या आहेत.

(२), (३) व (४) शासन निर्णय, दिनांक ०८/०९/२००६ अनुसार राज्यातील समुद्रकिनाऱ्यांवर फिरावयास जाणाऱ्या पर्यटकांना व सर्वसामान्य जनतेला पोहण्याच्या ठिकाणावर सुरक्षिततेसाठी उपाययोजना ठरवून देण्यात आल्या आहेत. त्यानुसार शहरी भागात नगर विकास विभाग व ग्रामीण भागात ग्राम विकास विभागामार्फत सुरक्षिततेबाबत उपाययोजना करण्यात येत आहेत. सदर शासन निर्णयानुसार ठरविलेल्या समुद्रकिनाऱ्यांवर पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(१) मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यावर सुरक्षिततेसंदर्भातील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. बृहन्मुंबई क्षेत्रातील गिरगाव, दादर, जुहू, वर्सोवा, अक्सा व गोराई या समुद्रकिनाऱ्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत जीवरक्षक नेमण्यात आले आहेत. त्याचबरोबर मेगाफोन, सायरन, रेस्क्युट्यूब, टॉर्च इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे. गिरगाव, जुहू, अक्सा व गोराई या ठिकाणी तात्पुरते वॉच टॉवर बांधण्यात आले आहेत. कायमस्वरुपी वॉचटॉवर आराखडे मंजूर करण्यात आलेले असून आवश्यक त्या मंजुऱ्या प्राप्त झाल्यावर त्यांच्या उभारणीचे काम करण्यात येईल. याकरिता मुंबई महानगरपालिकेमार्फत आवश्यक ती आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे जीवरक्षकांना राष्ट्रीय लाईफ सेव्हिंग सोसायटी या संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात आलेले आहे व ऑनकॉल रुग्णवाहिकाही उपलब्ध आहेत.

(२) समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी सन २०१६-२०१७ मध्ये पर्यटन विभागामार्फत लाईफ जॅकेट, लाईफ बोये, मेगाफोन, बीओबी रोप, डायव्हिंग गॉगल्स, वूलन जॅकेटस, दुर्बिण, शिट्ट्या, विद्युत वॉल माऊन्टेड सायरन, सर्च लाईट हॅलोजन, फायबर स्ट्रेचर्स, टेहळणी मनोरे (वॉच टॉवर्स), टेहळणी मनोरे कक्ष इत्यादी साहित्यसामग्री पुरविण्यासाठी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पालघर जिल्ह्यास निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. तर जीवरक्षक प्रशिक्षणासाठी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पालघर जिल्ह्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

(३) शासन निर्णय, दिनांक ०८/०९/२००६ ला अनुसरुन ग्राम विकास विभागाने ग्रामीण क्षेत्रातील ठरविलेल्या समुद्रकिनाऱ्यांकरिता जीवरक्षकांच्या मानधनासाठी व आवश्यक उपाययोजनांसाठी सन २०१६-२०१७ मध्ये व २०१७-२०१८ साठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. तसेच दिनांक १८/०९/२०१७ च्या शासन निर्णयान्वये रत्नागिरी जिल्ह्याकरिता अतिरिक्त उपाययोजनांसाठी निधी मंजूर केला असून दिनांक १९/०८/२०१७ च्या शासन निर्णयान्वये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अतिरिक्त उपाययोजनांकरिता निधी मंजूर केलेला आहे.

(४) रायगड, रत्नागिरी, पालघर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यात ठरवून दिलेल्या समुद्रकिनाऱ्यांवर जीवरक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. माहिती व धोक्याच्या सूचना देणारे फलक लावण्यात आले आहेत. सायरन, वॉचटॉवर्स इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. या ठिकाणी आपत्कालीन प्रसंगी प्रथमोपचारासाठी नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्राची माहिती फलकावर लावण्यात आली आहे.

(५) रायगड, रत्नागिरी, पालघर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील समुद्रकिनारी नियुक्ती करण्यासाठी एकूण ९९ जीवरक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(६) राज्यातील समुद्रकिनाऱ्यांवर करावयाच्या सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका (P.I.L) दाखल करण्यात आली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील सिंचन योजना पूर्ण करण्याबाबत

**(३५) * ३८४५७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी असलेल्या सिंचन विहीर योजनेला सन २०११-१२ मध्ये रुपये ४ कोटी ३० लाखांचे अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक वैयक्तिक लाभाच्या विहिरी अपूर्णच राहिल्या असून चुकीच्या पध्दतीने लाभार्थ्यांची निवड केल्याने अनुदान परत गेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शेतकऱ्यांच्यादृष्टीने महत्वाची असलेली सिंचन योजना पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मोखाडा तालुक्यात (जि.पालघर) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०११-१२ मध्ये प्रत्यक्षात १०१ सिंचन विहिरींच्या कामांना सुरुवात करण्यात आली होती. त्यापैकी, ५७ सिंचन विहिरी पूर्ण झाल्या असून ४४ सिंचन विहिरी अपूर्ण अवस्थेत आहेत. त्यापैकी २६ सिंचन विहिरींची कामे ७५ % पूर्ण झाली असून १८ विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील रस्त्यांच्या डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३६) * ३८५३३ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील सावरगांव मंग्याळ रस्त्याचे ३ कि.मी. अंतराचे डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले असून त्यापुढील २ कि.मी. अंतराचा रस्ता खड्डेमय झाला असल्याने त्याठिकाणी अपघात होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रस्त्याचे अपूर्ण असलेले डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) रस्ता खराब झाला आहे हे खरे आहे. परंतु ह्या रस्त्यावर वारंवार अपघात होत असल्याचे आढळून आले नाही.
(२) सदर रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून प्रश्नांकित सावरगांव-मंग्याळ-पैसमाळ-प्रजिमा- उंद्री पमु हा इतर जिल्हा मार्ग क्र. १२३ असून या रस्त्याची लांबी ९.५०० कि.मी. आहे. या लांबीपैकी ०/०० ते ३/०० कि.मी. लांबीचा पृष्ठभाग डांबरी असून त्यावर खड्डे पडले आहेत. त्यामुळे ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम सन २०१७-१८ गट ब अंतर्गत ०/०० ते २/०० कि.मी. लांबीच्या पृष्ठभागाचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे.

३/०० ते ७/०० कि.मी. खडीचा पृष्ठभाग आहे. या पृष्ठभागाच्या लांबीचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम सन २०१६-१७ गट ब कार्यक्रमातून प्रगतीपथावर आहे. तसेच २/७०० ते ३/०० कि.मी. (ओव्हरलॅप) लांबीच्या पृष्ठभागाचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाटण (जि.सातारा) तालुक्यातील गाभा कोअर क्षेत्रातील १४ गावे वगळण्याबाबत

**(३७) * ३८९४५ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यातील सहयाद्री व्याघ्र प्रकल्पाचा गाभा कोअर क्षेत्रातील १४ गावे वगळण्याबाबतचे निर्देश मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ रोजी शासनास देवून ३० दिवसाच्या आत निर्णय घेण्यात यावा असे निर्देश देवूनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावे वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य क्षेत्रात असणाऱ्या विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करणे व राष्ट्रीय उद्याने व अभयारण्याच्या सिमांचे सुसूत्रिकरण करणे इत्यादी बाबतीत मा.सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले आदेश व मार्गदर्शन यांचे अनुरुप राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीने स्वत:च्या गुणवत्तेनुसार निर्णय घ्यावा व सदर निर्णयाची प्रत केंद्रीय सशक्तता समितीला ३० दिवसाच्या आत द्यावी असे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०५/१०/२०१५ रोजी आदेश परीत केले आहेत.
(२) राज्यात ५ अभयारण्ये घोषित करण्याच्या अटीवर कोयना अभयारण्यातील पाटण तालुक्यातील १४ गावातील वनेत्तर क्षेत्र वगळणेसाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाने दिनांक १३/०६/२०१२ रोजीच्या २५ व्या बैठकीत मान्यता प्रदान केली आहे.

त्यानुसार राज्यात ५ अभयारण्य व १ संवर्धन राखीव क्षेत्र अधिसूचीत करण्यात आले असून कोयना अभयारण्याच्या सीमेचे सुसूत्रिकरण करण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हा परिषदेंतर्गत वर्ग-१ व वर्ग-२ संवर्गाच्या अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३८) * ३८१२५ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हा परिषदेंतर्गत मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महिला व बाल विकास अधिकारी, समाज कल्याण अधिकारी, कार्यकारी अभियंता लघु सिंचन विभाग, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग, जिल्हा पशुसंवर्धन

अधिकारी, इत्यादी वर्ग-१ संवर्गाची ०९ पदे रिक्त असून वर्ग-२ अधिकाऱ्यांची ६० पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेंतर्गत विविध विभागामधील वर्ग-१ व वर्ग-२ संवर्गाच्या अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे जिल्हयातील विकास कामे व योजना राबविण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच अध्यक्ष जिल्हा परिषद, अकोला यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०१७ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्रव्यवहार करुन सदर बाब निदर्शनास आणून दिली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) माहे जानेवारी २०१८ मध्ये अकोला जिल्हा परिषदेमधील वर्ग-१ची ११ व वर्ग-२ ची ६७ असे एकूण ७८ पदे रिक्त होती.

(२) जिल्हा परिषदेतील सध्या जी पदे रिक्त आहेत,त्या पदांचे अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्यांकडे/कर्मचाऱ्यांकडे सोपवून प्राप्त निधींची कामे करून घेतली जातात.

(३) व (४) मा.अध्यक्ष महोदया जि.प.अकोला यांनी पत्र क्र. ४३४ दिनांक १६/१२/२०१७ अन्वये मा.मुख्यमंत्री महोदय यांना वर्ग १/२ संवर्गातील अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत विनंती केली आहे.

जिल्हा परिषदेतील वर्ग-१ व वर्ग-२ मधील विविध विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत या विभागाकडून सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना योग्य ती कार्यवाही करण्याबाबत दिनांक २२/०७/२०१६ व दिनांक २१/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. रिक्त पदे बदली, पदोन्नती आणि सरळ सेवेने भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बदलापूर (जि.ठाणे) येथील शवविच्छेदन केंद्र बंद असल्याबाबत

**(३९) * ३९२७५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरु असलेल्या ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात आला असून त्याठिकाणी बांधण्यात आलेल्या शवविच्छेदन केंद्रासाठी आवश्यक असलेला तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारीवर्ग अद्याप नियुक्त केला नसल्याने सदर शवविच्छेदन केंद्र बांधून पुर्ण होऊनही बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शवविच्छेदन केंद्रावर कर्मचारी नियुक्त न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शवविच्छेदन केंद्रासाठी आवश्यक असलेला तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारीवर्ग नियुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, बदलापूर, जि.ठाणे येथे शवविच्छेदन करण्यासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे. तथापि, शवविच्छेदन गृहाची दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत चालू असल्यामुळे सद्यःस्थितीत शवविच्छेदनाचे काम बंद आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य कामगार विमा योजनेच्या दुरवस्थेबाबत

**(४०) * ३९६८० डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई राज्य कामगार विमा योजना वसाहतीच्या दुरवस्थेकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राज्यस्तरीय शासकीय महिला कर्मचारी व शासकीय कुटुंब महिला मंचाच्यावतीने दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास उपोषण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य कामगार विमा योजनेच्या वसाहतीची दुरवस्था झाल्याने कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत संघटनेने मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, आयुक्त, राज्य कामगार विमा योजना तसेच वैद्यकिय अधिक्षक यांना निवेदने सादर करुनही कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्य शासकीय महिला कर्मचारी व शासकीय कुटुंब महिलामंच या संघटनेने दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी उपोषण करण्याबाबत दिनांक २२/१२/२०१७ रोजी निवेदन सादर केले हाते. तथापि, सदर संघटनेने त्यांचे दिनांक १०/०१/२०१८ चे उपोषण मागे घेतले.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर वसाहतीत वास्तव्यास असलेल्या १११ कर्मचाऱ्यांना स्थानांतरीत करुन पर्यायी निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

या संबंधी काम करण्यासाठी संस्थेची नियुक्ती नियमानुसार करण्यात आली असून राज्य कामगार विमा रुग्णालय, ठाणे येथील प्रलंबित Annual Repair & Maintainance कामास सदर संस्थेने सुरुवात केली आहे.

तसेच, ज्या इमारतींची विशेष दुरुस्ती किंवा त्या पुर्णत: नष्ट करणे आवश्यकता आहे. अशा कामासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर केलेल्या अंदाजपत्रकांना राज्य कामगार विमा महामंडळाने मान्यता दिली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या समस्यांबाबत

**(४१) * ३९७३४ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुलुंड परिसरात बिबटया शिरुन पाच जणांना जखमी केल्याची घटना दिनांक १४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या परिसरात नागरी वस्त्या निर्माण होत असल्याने या वनातील हिंस्त्र प्राणी नागरी वस्त्यांमध्ये शिरण्याचे प्रकार घडत असल्याने नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन विभागाच्या दुर्लक्षतेमुळे उद्यानाची सीमा रेषा कमी होऊन तेथील वन्य प्राणी व नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्राणी व नागरिकांची सुरक्षा तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यान नष्ट होण्यापासून वाचविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) मौजे मुलुंड, नानेपाडा येथे दिनांक १३/०१/२०१८ रोजी बिबट्याच्या हल्ल्यात सहा व्यक्ती जखमी झाल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आले आहे.

(२), (३) व (४) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची वनहद्द कायम असून कमी झालेली नाही.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे निर्मितीपूर्वी पासून काही ठिकाणी वनक्षेत्रात मानवी वस्त्यांचे अस्तित्व होते. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अतिक्रमकांचे पुनर्वसन प्रक्रिया प्रगती पथावर आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमक व आदिवासी पाडे यांचे पुनर्वसनाचे नियोजन व पुनर्वसनाकरिता पर्यायी जागा निश्चित करण्याच्या अनुषंगाने दिनांक २०/०२/२०१८ रोजी उच्चस्तरीय सशक्तता समिती स्थापित करण्यात आली आहे.

सदर उद्यानातील हिस्त्र वन्यप्राणी, प्रामुख्याने बिबटे, वनातील सावजापेक्षा नागरी वस्तीमधील घनकचऱ्यावरील भटकी कुत्रे, डुक्कर, शेळ्या-मेंढ्या यांचेसारख्या सोप्या सावजाकडे आकर्षित होतात.

नागरी क्षेत्रात वनातील हिंस्त्र प्राण्यांपासून घ्यावयाची आवश्यक खबरदारी व काळजी याबाबत नागरी वस्त्या, शाळा, कॉलेज, पोलीस स्टेशन, महाविद्यालयांमध्ये बिबट्या या प्राण्याच्या सवयी, स्वभाव गुण, बिबट्या दिसल्यास घ्यावयाची खबरदारी, कोणत्या गोष्टी कराव्यात किंवा करण्यात येवू नये याबाबत अविरत जनजागृती करण्यात येते.

बिबट्याबाबत तक्रारी प्राप्त होताच त्वरीत वन अधिकारी/कर्मचारी हे घटनास्थळी जावून परिसराची पाहणी करुन ग्रामस्थांना सूचना देतात व सदर परिसरात वनकर्मचाऱ्या मार्फत रात्र / दिवस गस्त घतली जाते.

प्रतिबंधात्मक उपययोजना म्हणून दररोज ४ वनकर्मचाऱ्या मार्फत वाहनाद्वारे रात्रीची गस्त घालण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडा विभागातील शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्यांची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(४२) * ३९८२८ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागातील सर्व जिल्हा परिषदांकडे जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्यांची माहे डिसेंबर, २०१७ मध्ये जिल्हानिहाय किती प्रकरणे मंजूरीअभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांचे आंतरजिल्हा बदलीचे सुधारित धोरण शासन निर्णय, दिनांक २४/४/२०१७ अन्वये विहीत करण्यात आलेले आहे. सदर धोरणानुसार शिक्षकांची आंतरजिल्हा बदली प्रक्रिया ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे राज्यस्तरावर राबविण्यात येत आहे. शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार प्रत्येक शिक्षकास आंतरजिल्हा बदलीस इच्छुक असल्यास स्वतंत्रपणे संगणकीय प्रणालीवर अर्ज सादर करता येतो व ज्या जिल्ह्यात शिक्षकास बदली हवी आहे त्या जिल्ह्यात पद उपलब्ध असल्यास संगणकीय प्रणालीद्वारे अशा शिक्षकाची बदली करण्यात येते. यास्तव आता जिल्हा परिषद स्तरावर शिक्षकांची आंतरजिल्हा बदलीची प्रकरणे मंजूरीअभावी प्रलंबित असण्याचा प्रश्न उदभवत नाही.

शिक्षकांच्या प्रस्तुत आंतरजिल्हा बदली धोरणानुसार सन २०१७ मध्ये जवळपास ५००० शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्या करण्यात आलेल्या असून आंतरजिल्हा बदली प्रक्रियेचा दुसरा टप्पा कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जुन्या अंगणवाडयांच्या इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत

**(४३) * ३९९११ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागाने नविन अंगणवाडयांचे बांधकाम करण्यासोबतच जुन्या अंगणवाडयांच्या इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी सन २०१४ ते २०१७ या तीन वर्षाच्या कालावधीत रुपये ८७ कोटी ६० लाखाचा निधी मंजूर केला, परंतु त्यातील रुपये २३ कोटी ६१ लाख खर्च करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०१५-१६ या वर्षातील अर्थसंकल्पात मंजूर केलेला रुपये २ कोटी १० लाख इतका निधी अखर्चित राहिला असून सन २०१६-१७ मध्ये निधीची तरतूद न करता सन २०१७-१८ मध्ये रुपये ५५ कोटींची तरतुद दाखविताना रुपये ९ कोटी १६ लाख उपलब्ध असताना निधी खर्च करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, महिला व बालविकास विभागाने मंजूर केलेला निधी अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

सन २०१४ ते २०१७ या तीन वर्षाच्या काळात एकात्मिक बाल विकास सेवा योजना बळकटीकरण व पुनर्रचना अंतर्गत समाविष्ट २० जिल्ह्यातील प्रति अंगणवाडी केंद्र रुपये २०००/- प्रमाणे अंगणवाडी केंद्र दुरुस्तीसाठी रुपये ७.९८ कोटी इतका निधी अंगणवाडी दुरुस्तीकरीता वितरीत करण्यात आला आहे. तसेच दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन

निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून नवीन अंगणवाडी बांधकाम करणे, ज्या जुन्या अंगणवाडयांत शौचालये नाहीत त्या ठिकाणी शौचालयाची बांधकामे करणे तसेच इमारतीची किरकोळ दुरुस्तीची कामे करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव येथे स्वतंत्र महिला रुग्णालय स्थापन करण्याबाबत

**(४४) * ४०१८२ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव येथे स्वतंत्र महिला रुग्णालय पुढील ३ महिन्यात स्थापन करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालय अद्यापही स्थापित केले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रुग्णालय स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) जळगाव येथे मौजे मोहाडी येथे स्वतंत्र नवीन १०० खाटांचे स्त्री रूग्णालय स्थापन करण्यास दिनांक १७/०१/२०१३ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली असून दिनांक ०७/०४/२०१६ च्या शासन निर्णयान्वये बांधकामाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार निविदा प्रक्रिया मागविण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोईसर (ता.जि.पालघर) खाजगी रस्त्यासाठी शासकीय निधीचा वापर केल्याबाबत

**(४५) * ४०२२७ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (ता.जि.पालघर) येथील ग्रामपंचायत हद्दीतील दलाल टॉवर विकासकाच्या खाजगी रस्त्यासाठी सरपंचानी शासकीय निधीचा गैरवापर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दलाल टॉवर इमारतीजवळ चारीही बाजुला संरक्षण भिंत असताना हा रस्ता फक्त सदनिकांसाठीचा रस्ता असूनही शाखा अभियंता यांनी बेकायदेशीरपणे अंदाजपत्रके बनवून कामे केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तारापुर मुख्य रस्त्यापासून दलाल टॉवर संकुल रस्ता हा विकासकाकडून वर्ग केल्याची कोणतीही माहीती ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नाही व विकासकाच्या फायद्यासाठी शासनाची फसवणूक करुन बेकायदेशिर बनवलेला रस्ता हा ग्रामपंचायतीचा आहे, असे दाखवून सरपंचानी आपल्या पदाचा दुरूपयोग केला असून सरपंच, ग्रामसेवक, शाखा अभियंता व विकासक यांनी शासनाची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर रस्ता दलाल टॉवर अंतर्गत परिसरातील विविध निवासी संकुलातील लोकांचा रहदारीचा रस्ता असल्याने सदर रस्त्याचे काम होणेबाबत ग्रामस्थांकडून मागणी होत होती. सदर रस्त्याची लांबी ३०३ कि.मी. आहे. सा.क्र. ०/०० ते ०/१४० या रस्ता लांबीच्या कामासाठी सन २०१५-१६ या वर्षात ३०५४-२७२२ या लेखाशीर्ष अंतर्गत मंजूर झाल्यानंतर रस्त्याचे काम जि. प. बांधकाम विभाग, पालघर मार्फत पूर्ण करण्यात आले. सदर कामासाठी रूपये १० लाख एवढा निधी उपलब्ध झाला होता.

तसेच सदर रस्त्याच्या उर्वरित लांबीच्या कामासाठी सन २०१७-१८ या वर्षात ३०५४-०४०७ या लेखाशीर्ष अंतर्गत रूपये १० लाख मंजूर असून सद्य:स्थितीत रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे व रस्ता सुस्थितीत आहे.
(३) हे खरे नाही.

दलाल टॉवर येथील रस्ता हा बोईसर तारापूर या मुख्य रस्त्याला जोडणारा आहे. सदर रस्ता हा ग्रामपंचायतकडे वर्ग करणेबाबत दलाल टॉवर परिसरातील सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी ग्रामपंचायतीला दिनांक १०/८/२०१६ रोजी पत्रव्यवहार केलेला आहे. सदरच्या रस्त्याचे वर्ग केल्याची नोंद ग्रामपंचायत नमुना नं. २३ वर घेण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अरबी समुद्रात तरंगते पंचतारांकित हॉटेल उभारण्यास उच्च न्यायालयाने परवानगी नाकारल्याबाबत

**(४६) * ४०३४४ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फ्लोटेल प्रकल्पांतर्गत राजभवनापासून दोन नॉटीकल मैल अंतरावर अरबी समुद्रात तरंगते पंचतारांकित हॉटेल उभारण्यासाठी एमटीडीसीने उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या हेरीटेज कमिटीची परवानगी मिळण्यापूर्वीच रश्मी बिल्डर्स नावाच्या खाजगी विकासकाबरोबर करार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पासाठी एमटीडीसीने आतापर्यंत किती खर्च केला आहे तसेच हेरिटेज कमिटीच्या परवानगीपूर्वी खाजगी विकासकाबरोबर करार करण्यास कोण जबाबदार आहे याबाबतची चौकशी शासनाने करावी अशाप्रकारची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने आवश्यक असलेल्या सर्व विभागांच्या परवानगींच्या अधीन राहून मे.रश्मी डेव्हलपमेंन्ट प्रा. लि. यांचे समवेत दिनांक १२ जुलै, २०१३ रोजी सामंजस्य करार केला आहे.

(२) या प्रकरणी चौकशीच्या मागणीचे पत्र प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने फ्लोटेल प्रकल्प राबविणेसाठी मे.रश्मी डेव्हलपमेंन्ट प्रा. लि. यांना विना आर्थिक सहाय्य (Non Financial Support) केले आहे. या प्रकल्पामध्ये महामंडळाचे कोणतेही आर्थिक सहाय्य नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पळसदरी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील धरणाची देखभाल व दुरूस्ती करण्याबाबत

**(४७) * ३८६८२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळसदरी (ता.कर्जत, जि.रायगड) येथे सन १९१२ मध्ये रेल्वे प्रशासनामार्फत वाफेच्या इंजिनाला पाणी पुरविण्यासाठी धरण बांधण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९० मध्ये वाफेचे इंजिन बंद केल्याने रेल्वे प्रशासनाकडून सदर धरणाच्या देखभालीकडे दुर्लक्ष होवून यातील गाळ न काढल्यामुळे धरणाच्या गाळात पर्यटक अडकल्याने त्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच सदर धरणाच्या भिंतीला झाडेझुडपे वाढल्यामुळे धरणाला तडे गेलेले असल्याने धरण फुटण्याची भीती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त धरणाच्या देखभाल व दुरूस्तीसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

सदर धरण मध्य रेल्वेच्या अखत्यारितील असून मध्य रेल्वे प्रशासनामार्फत वाफेची इंजिने, रेल्वे स्टेशन व रेल्वे निवासी वसाहतीकरिता पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी सदर धरण बांधण्यात आले आहे.

(२) नाही.

वेळोवेळी रेल्वे प्रशासनामार्फत धरणाची देखभाल व दुरुस्ती केली जात असून धरण सुस्थितीत आहे.

(३) धरण भिंतीची दुरुस्ती रेल्वेकडून सन २०१४ मध्ये करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सन २०१८ मध्ये धरण भिंतीची दुरुस्ती पुन्हा करण्याचे रेल्वेकडून नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतन व आकृतिबंधाबाबत

**(४८) * ३७८६२ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत व आकृतिबंधाबाबत शिफारशी करण्यासाठी शासनाने दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी समिती गठीत केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने जिल्हा परिषद आणि नगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीचा अभ्यास करून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध सुधारण्यासाठी शासनास अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सुमारे ४० हजार ग्रामपंचायत कर्मचारी यांना दिनांक १ जानेवारी, २००० पासून वेतन अदा करण्याकरिता ५० टक्के अनुदान ग्रामपंचायतीला देण्यात येवून दिनांक १ ऑगस्ट, २०१३ पासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डॉ.दीपक म्हैसकर यांच्या समितीने उक्त प्रकरणी शासनास दिलेल्या अहवालानुसार ग्रामपंचायत कर्मचारी यांना वेतनश्रेणी, निवृत्तीवेतन व उपदान लागू करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय. हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या शासन निर्णय दिनांक २१/०१/२००० अन्वये राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांकरीता आकृतिबंध निश्चित करण्यात आला असून सदर कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनासाठी जो खर्च येईल त्याकरीता शासन एकूण खर्चाच्या ५० टक्के एवढे अनुदान देईल असा निर्णय घेण्यात आला असून सदर निर्णय दिनांक ०१/०१/२००० पासून लागू करण्यात आला आहे.

शासन निर्णय दिनांक ०४/०३/२०१४ अन्वये ग्रामपंचायतीचे उत्पन्न व लोकसंख्या विचारात घेऊन वरील शासन निर्णयातील आकृतिबंधानुसार नेमलेल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतनासाठी राज्य शासनाच्या हिश्श्यामध्ये वाढ करून तो १०० टक्के, ७५ टक्के व ५० टक्के इतका निश्चित करण्यात आला आहे.
(४) व (५) राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीबाबत शिफारशी करण्यासाठी शासनाने दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर पेन्शन देणेबाबत गठीत करण्यात आलेल्या डॉ. दिपक म्हैसेकर यांच्या समितीने सन २००९ मध्ये शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने स्टेट बँक ऑफ इंडिया व एलआयसीकडून प्रस्ताव मागविण्यात आला होता. तथापि यास अद्यापपर्यंत प्रतिसाद प्राप्त झाला नसल्याने सचिव (ग्रामविकास) यांचेकडे स्टेट बँक ऑफ इंडिया व एलआयसीच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक १७/०५/२०१७ च्या अधिसूचनेन्वये उपदानाची मर्यादा रुपये ३,५०,०००/- ऐवजी रुपये १०,००,०००/- इतकी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या कामगार मंत्रालयाने दिनांक ०८/०१/१९८२ च्या अधिसूचनेन्वये ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी काम करीत आहेत, अशा संस्थांतील कर्मचाऱ्यांना उपदान प्रदान अधिनियम १९७२ लागू होत असल्याबाबत निदेश दिले आहेत. ही बाब लक्षात घेता केंद्र शासनाच्या दिनांक १७/०५/२०१७ च्या अधिसूचनेन्वये उपदानाची मर्यादा रुपये ३,५०,०००/- ऐवजी रुपये १०,००,०००/- इतकी करण्यात आली असल्याबाबतची बाब ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना लागू होईल किंवा कसे, ही बाब तपासण्यात येत आहे.

-----------------

## गादेगांव ते पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(४९) * ३८८७९ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गादेगांव ते पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे जिवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्यांची देखभाल, दुरूस्ती करण्याबाबत तसेच सदरहू रस्त्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही. रस्त्याची दुरवस्था झालेली नसून किरकोळ स्वरुपाचे खड्डे पडलेले आहेत.

(२) सदर रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे. प्रश्नांकित गादेगाव ते रा.मा.१४३ हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ५० असून या रस्त्याची एकूण लांबी ४.५० कि.मी. आहे. संपूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची आहे. रस्त्यावर किरकोळ स्वरुपाचे खड्डे पडले आहेत.

सन २०१७-१८ मध्ये जिल्हा नियोजन समितीकडून उपलब्ध रुपये २.५८ रुपये लक्ष निधीमधून रस्त्याच्या ०/५०० ते ०/७५० कि.मी. या लांबीत रस्ता दुरुस्तीचे काम प्रगतीत आहे. सद्या रस्त्यावर वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.

उर्वरीत रस्त्याच्या डांबरीनुतनीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मध्य वैतरणा जलविद्युत प्रकल्प राबविण्याबाबत

**(५०) * ३९९२२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३६०९० ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २५ मेगावॅट पर्यंतचे जलविद्युत प्रकल्प हे विकसनासाठी खाजगी प्रवर्तकांना देण्याबाबतचा निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २००९ च्या शासननिर्णयानुसार घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार मध्य वैतरणा जलविद्युत प्रकल्पाचे विकसनासाठी मे.महालक्ष्मी कोनाल ऊर्जा प्रा.लि. पुणे यांनी दिनांक २० जानेवारी, २०१० रोजी तर मुंबई महानगरपालिकेने त्यासाठी सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. ट्रिगॉन कन्सल्टंट कंपनीच्या शासन मान्यतेसाठी दिनांक ३० जून, २०१० रोजी प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी सल्लागार नियुक्तीस परवानगी देण्याचा निर्णय शासनाने दोन्ही प्रस्ताव प्राप्तीनंतर दिनांक २८ फेब्रुवारी, २०११ रोजी म्हणजेच वर्षभराचे कालावधीनंतर घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने नेमलेल्या सल्लागाराचे फी वर रुपये ५१ कोटी खर्च झालेले असताना तसेच महानगरपालिकेच्या प्रस्तावावर मा.मुख्यमंत्री यांनी पुनर्विलोकनाबाबतचे आदेश दिलेले असताना, पुनर्विलोकन न करताच मे.महालक्ष्मी कोनाल ऊर्जा प्रा.लि. पुणे यांना प्रकल्पाच्या विकसनाची परवानगी देण्यात आल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) राज्यातील २५ मेगावॅट पर्यंतचे जलविद्युत प्रकल्प हे विकसनासाठी खाजगी प्रवर्तकांना देण्याबाबतचा निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २००५ च्या शासन निर्णयानुसार घेण्यात आला आहे.

(२) मध्य वैतरणा जलविद्युत प्रकल्पाचे विकसनासाठी मे. महालक्ष्मी कोनाल ऊर्जा प्रा. लि. पुणे यांनी दिनांक २० जानेवारी, २०१० रोजी शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे, तर मुंबई महानगरपालिकेने त्यासाठी सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. ट्रिगॉन कन्सल्टंट कंपनीच्या शासन मान्यतेसाठी नव्हे तर मध्य वैतरणा जलविद्युत प्रकल्पाचे विकसनासाठी दिनांक ३० जून, २०१० रोजी प्रस्ताव सादर केला आहे.

(३) होय.

(४) सदर प्रकल्पासाठी प्रकल्प विकसनाबाबतची परवानगी मे. महालक्ष्मी कोनाल उर्जा प्रा.लि. यांना दिनांक २८/०२/२०११ रोजी देण्यात आली आहे. तसेच जल विद्युत विकास करारनामा दिनांक ०७/०३/२०१३ रोजी केलेला आहे. महानगर पालिकेच्या प्रस्तावाबाबत दिनांक २६/०८/२०१४ रोजी तत्का. मा.मुख्यमंत्री यांनी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:

“मध्य वैतरणा धरणाची मालकी आणि नियंत्रण बृहन्मुंबई महानगरपालिकेची असून वन विभागाने सदर धरणाची व पायथ्याखालील जागा महानगरपालिकेला हस्तांतर केली आहे.

सबब महानगरपालिकेची मान्यता न घेता व बेस्ट उपक्रमास डावलून प्रस्तावित जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणाव्दारे राबविणे उचित होणार नाही. तथापि, बेस्ट उपक्रमामार्फत सदर प्रकल्प विकसित करावयास अडचण असल्यास आणि हा प्रकल्प शासनास घ्यावयाचा झाल्यास महाजनको मार्फत घेण्यात यावा."

(५) शासन स्तरावर याबाबत पुनर्विलोकनाची कार्यवाही चालू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन लागू करणेबाबत

**(५१) * ३९२३५ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी निवृत्तीवेतन संघटनेमार्फत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना पेन्शन लागू करा अशा आशयाचे निवेदन माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २० वर्ष सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्याला दर महिन्याला रुपये चार हजार किंवा रुपये तीन लाख निवृतीच्यावेळी देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्रामपंचायत कर्मचाऱ्याला निवृत्तीवेतन लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी निवृत्तीवेतन संघटनेमार्फत, दिनांक ०९/०१/२०१७, दिनांक १७/०१/२०१७, दिनांक २०/०२/२०१७, दिनांक ०९/०३/२०१७, दिनांक ०९/०३/२०१७ रोजी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना पेन्शन लागू करा अशा आशयाचे निवेदन दिले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर पेन्शन देणेबाबत गठीत करण्यात आलेल्या डॉ. दिपक म्हैसेकर यांच्या समितीने सन २००९ मध्ये शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने स्टेट बँक ऑफ इंडिया व एलआयसी कडून प्रस्ताव मागविण्यात आला होता. तथापि यास अद्यापपर्यंत प्रतिसाद प्राप्त झाला नसल्याने सचिव (ग्रामविकास) यांचेकडे स्टेट बँक ऑफ इंडिया व एलआयसी च्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## मानखुर्द येथील बालसुधारगृहातील मुलांच्या जेवणात अळ्या आढळून आल्याबाबत

**(५२) * ३९८१२ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द येथील दिनांक चिल्ड्रन एड् सोसायटींतर्गत येणाऱ्या बालसुधारगृहातील बालकल्याण नगरीतील मुलांच्या जेवणात अळ्या आढळून येणे, अन्नाचा दर्जा निकृष्ठ असणे, मुलांच्या सुरक्षेसाठी सुरक्षारक्षक नसणे, शासनाकडून दिले जाणारे अनुदान अपुरे असणे तसेच बालकांचा होणारा मानसिक व शारिरीक छळ यामुळे बालसुधारगृहातील बालके पळून जात असल्याच्या घटना घडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) मुंबईतील मानखुर्द येथील काही बालके न सांगता संस्थेतून निघून गेल्या प्रकरणी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मुंबई व दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी, मुंबई यांनी नियुक्त केलेल्या ०४ सदस्यीय चौकशी समिती मार्फत चौकशी करण्यात आली असुन, त्यामध्ये अन्नाचा दर्जा निकृष्ठ असणे, बालकांचा होणारा शारिरीक व मानसिक छळ याबाबत तथ्य आढळून आले नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील भटक्या व विमुक्त जातीच्या लोकांसाठी स्वतंत्र राष्ट्रीय आयोग गठीत करण्याबाबत

**(५३) * ४०५४९ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १४ कोटी लोकसंख्या असलेल्या भटक्या व विमुक्त जातीच्या लोकांसाठी स्वतंत्र राष्ट्रीय आयोग गठीत करण्याबाबतची शिफारस श्री.भिकुजी इदाते यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या आयोगाने केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आयोगाने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, असल्यास, केंव्हा,
(३) असल्यास, सदर अहवालातील शिफारशी शासनाने मान्य केल्या आहेत काय व त्याची अंमलबजावणी केंव्हापासून करण्यात येणार आहे,
(४) तसेच, उक्त शिफारशी व्यतिरिक्त कोणकोणत्या शिफारशी आयोगाने आपल्या अहवालात केल्या आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## थॅलेसेमिया रुग्णांसाठी "५ डे केअर युनिट्स" सुरु करण्याबाबत

**(५४) * ३७७९४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थॅलेसेमिया रुग्णांसाठी आवश्यक असलेल्या औषधांचा निर्माण झालेला तुटवडयाबाबत राज्यात "५ डे केअर युनिट्स" सुरु करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजमितीस एकही "५ डे केअर युनिट्स" सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१५ मध्ये औरंगाबाद, बीड, अमरावती, अहमदनगर आणि सोलापूर येथे मंजूर करण्यात आलेल्या "५ डे केअर युनिट्स" अद्याप कार्यान्वित न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने राज्यात "५ डे केअर युनिट्स" विनाविलंब व सुरळीतपणे सुरु होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रूग्णालय औरंगाबाद येथे डे केअर युनिट्सचे बांधकाम सुरू असून बीड येथे त्यासंदर्भातील निवीदा प्रक्रिया सुरू आहे.

जिल्हा रूग्णालय, अमरावती येथे डे केअर युनिट्स कार्यान्वित आहे.

जिल्हा रूग्णालय, अहमदनगर येथील डे केअर युनिट्स फेब्रुवारी २०१८ अखेर सुरू करण्यात येणार आहे.

सोलापुर येथे डे केअर युनिटसाठी जागा उपलब्ध करून घेण्यात येत आहे. जागा उपलब्ध झाल्यानंतर तेथे डे केअर युनिट तातडीने सुरू करण्यात येईल.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कर्जमाफी जाहिर केल्यामुळे होणारी आर्थिक तुट दूर करण्याबाबत

**(५५) * ३९३७२ डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक ३५९७६ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनांतर्गत रुपये ३४,०२२ कोटी इतका निधी तातडीने द्यावयाचा असल्याने व हा खर्च प्राथम्याने करावयाचा असल्याने खुल्या बाजारातून रुपये २० हजार कोटी इतके अधिकचे कर्ज उभारणीस अनुमती देण्याची केंद्र शासनास राज्य शासनाकडून विनंती करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून त्यानुषंगाने अनुमती प्राप्त झाली आहे काय व राज्य शासनामार्फत सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचे लाभ मिळणेचे अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) व (३) होय, केंद्र शासनाकडून त्यानुषंगाने अनुमती प्राप्त झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ चा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जातील माहिती व बँकांकडील माहिती यांचा सॉफ्टवेअरमार्फत ताळमेळ घालून पात्र लाभार्थ्यांच्या याद्या तयार करण्यात येतात. सदर याद्यांच्या आधारे पात्र शेतकऱ्यांसाठी

कर्जमाफी किंवा प्रोत्साहनपोटी रकमा सर्व संबंधित बँका यांना पाठविण्यात येऊन बँकांतर्फे पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येते. आतापर्यंत शेतकऱ्यांच्या ३१.३२ लाख खात्यांमध्ये सदर योजनेंतर्गत लाभ देण्यात आला आहे. उर्वरित पात्र अर्जदार शेतकऱ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

-----------------

## राज्यातील पाच जिल्ह्यात राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या शोध मोहिमेबाबत

**(५६) * ३८२१६ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाच जिल्ह्यात दिनांक ३१ जानेवारी, २०१७ रोजी राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या शोध मोहिमेत ८४ लाख नागरीकांची तपासणी केली असता २ हजार ११८ क्षय रोगाचे पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून त्यातील १ हजार रुग्णांना पुरेसा उपचार न मिळाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने राज्यात क्षय रुग्णांचे प्रमाण कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१७ मध्ये केंद्र शासनाच्या सूचनेमध्ये तीन टप्प्यांमध्ये सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम राबविण्यात आली (पहिला टप्पा माहे जानेवारी, २०१७, दुसरा टप्पा-माहे जुलै, २०१७ व तिसरा टप्पा-माहे डिसेंबर, २०१७) त्यापैकी गृहभेटीव्दारे ९३,५५,२६७ लोकसंख्येची तपासणी करण्यात आली त्यातून २,६२० क्षयरुग्ण शोधण्यात आले हे खरे आहे.

तथापी त्यातील १००० क्षयरुग्णांना पुरेसा उपचार न मिळाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला, हे खरे नाही. मोहिमेत शोधलेल्या रुग्णांपैकी ४० रुग्णाचा मृत्यू झाला त्यापैकी ३७ रुग्णाना औषधोपचार सुरु करण्यात आला होता आणि ३ रुग्णाचा मृत्यू निदान झाल्यानंतर औषधोपचार सुरु करण्यापूर्वी अतिगंभीर आजारामुळे झाला

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्हयात नर्सिंग कॉलेजसाठी मान्यता देऊनही कॉलेजच्या कामाला सुरुवात न झाल्याबाबत

**(५७) * ३८५०३ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हयात नर्सिंग कॉलेजसाठी मान्यता देऊनही कॉलेजच्या कामाला सुरुवात करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात १० नर्सिंग कॉलेजला मान्यता दिली असून त्यातील ९ कॉलेजचे काम सुरु करण्यात आले, परंतू नंदुरबार नर्सिंग कॉलेजच्या उभारणीसाठी अद्याप निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच नर्सिंग कॉलेजचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही, हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एलबीटीच्या नुकसान भरपाईसाठी केंद्र शासनाकडे मागणी करण्यात आल्याबाबत

**(५८) * ३९६२६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ३२१५३ ला दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जीएसटी लागू झाल्यापासून राज्यातील महानगरपालिकांमध्ये स्थानिक संस्था कर (एलबीटी) रद्द झाल्यामुळे राज्य शासनावर ३२९० कोटी रुपयांचा भार असल्यामुळे राज्याची आर्थिक स्थिती बिकट झाली असून केंद्र शासनाच्या सूचनेनुसार एलबीटी रद्द करण्यात आल्यामुळे रुपये ३२९० कोटी एवढी आर्थिक मदत नुकसान भरपाई म्हणून केंद्र शासनाने राज्य शासनास द्यावी, अशी विनंती राज्य शासनाने केंद्र शासनास केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत केंद्र शासनाकडून काय कार्यवाही केली असून त्याबाबत केंद्र शासनाने राज्य शासनास काय कळविले आहे व नुकसान भरपाईपोटी किती मदत दिलेली आहे,

(३) नसल्यास, केंद्र शासनाकडून राज्य शासनास नुकसान भरपाई मिळणेबाबत पाठपुरावा करण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. राज्य शासनाने ५० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यावरील स्थानिक संस्था कर १ ऑगस्ट, २०१५ ला रद्द केला व त्यामुळे झालेल्या महसूल हानीबाबत शासनाने स्थानिक संस्थांना सन ऑगस्ट २०१५-१६ या कालावधीत रुपये ३२९० कोटी रुपये नुकसान भरपाईपोटी दिले. स्थानिक संस्थांना दिलेल्या रुपये ३२९० कोटीचे अनुदान जीएसटी अंतर्गत राज्यास प्राप्त होणाऱ्या नुकसान भरपाईची परिगणना करताना विचारात घेण्यात यावे याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनास विनंती केली आहे.

(२) केंद्र शासनाने राज्य शासनास काही कळविलेले नाही.

(३) होय. नुकसान भरपाई मिळणेबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(५९) * ३८३३२ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १८०७१ ला दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांची ४१८ पदे रिक्त असून जिल्हा रुग्णालयात १२९ पदे भरण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना गोवा, कोल्हापूर, बेळगांव किंवा मुंबईच्या रुग्णालयात न्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत तसेच सावंतवाडी, कणकवली या उपजिल्हा रुग्णालयांसह तरळे येथे ट्रामा केअर सेंटर उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा/उपजिल्हा व ग्रामीण रूग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण ९२ पदे मंजूर असून ४७ पदे भरलेली आहेत व ४५ पदे रिक्त आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची ७६ पदे मंजूर असून त्यापैकी ३७ पदे भरलेली आहेत व ३९ पदे रिक्त आहेत. जिल्हा रूग्णालय सिंधुदुर्ग येथे गट-अ ते गट-ड चे एकूण ३६९ पदे मंजूर असून २३९ पदे भरण्यात आली आहेत व १३० रिक्त आहेत.

(२) उपलब्ध वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत सर्व रूग्णांवर औषधोपचार करण्यात येतात. आवश्यकता भासल्यास रूग्णांना नजीकच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे संदर्भित केले जाते.

(३) व (४) वैद्यकीय अधिकारी गट-अ ची रिक्त पदे भरणेबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

सावंतवाडी व कणकवली येथील उपजिल्हा रूग्णालयात ट्रॉमा केअर युनिटचे बांधकाम करण्यात आले आहे. तळेरे येथे अद्याप जागा उपलब्ध झालेली नाही. निकषानुसार जागा उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## येवला (जि.नाशिक) तालुक्यातील शेतकऱ्यांनी शेततळ्यांचा लाभ मिळण्याकरिता लक्षांक वाढवून देण्याबाबत

**(६०) * ३९२४५ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील ४६१८ शेतकऱ्यांनी "मागेल त्याला शेततळे" या योजनेमधून अर्ज केले असून त्यातील ७३० शेतकऱ्यांना शेततळ्याचा लाभ मिळाला तर ३८८० शेतकरी माहे जानेवारी, २०१८ पर्यंत शेततळ्यांसाठी असलेल्या लाभाच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने येवला तालुक्यासाठी शेतकऱ्यांना शेततळ्यांचा लाभ मिळण्यासाठी लक्षांक वाढवून देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही. “मागेल त्याला शेततळे” या योजनेंतर्गत येवला (जि.नाशिक) तालुक्यात दिनांक १२/२/२०१८ पर्यंत ५९४९ शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झालेले आहेत. छाननीअंती त्यापैकी ९५१ अर्ज विविध कारणांनी रद्द करण्यात आले आहेत. उर्वरित ४९९८ अर्जापैकी ४६२४ अर्जांना तालुकास्तरीय समितीने मंजुरी दिली असून ३७४ अर्जांची छाननी सुरु आहे. तालुका स्तरीय समितीने मंजुरी दिलेल्या शेततळयांपैकी ४०१६ लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ९८९ शेततळ्यांची कामे पूर्ण झाली असून ४२ कामे सुरू आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यात १० नवीन आरोग्य केंद्राना मान्यता देणेबाबत

**(६१) * ३८७३६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागांतर्गत जिल्ह्यात ५० प्राथमिक आरोग्य केंद्रे व २७९ आरोग्य उपकेंद्रे कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागातील नागरीकांना तात्काळ आरोग्य सेवा मिळावी यासाठी चालू वर्षात १० नवीन आरोग्य केंद्रे उभारण्यासाठी जिल्हा परिषदेने ठराव करुन प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडे पाठवला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारणसभेची मान्यता मिळाल्यानंतर जिल्हा आरोग्य कार्यालयाने सदर केंद्रासाठी इमारत उभारणीसाठी निधी व मनुष्यबळ उपलब्ध करण्याचा प्रस्ताव आरोग्य संचालनालयाकडे पाठवला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने १० नवीन आरोग्य केंद्रे उभारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) १० नवीन आरोग्य केंद्रे उभारण्याबाबतचा प्रस्ताव औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून सार्वजनिक आरोग्य विभागास प्राप्त झालेला नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाचोड येथील ग्रामीण रुग्णालयात बांधलेले ट्रामा केअर सेंटर बंद असल्याबाबत

**(६२) * ३९७३७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील पाचोड येथील ग्रामीण रुग्णालयातील ट्रामा केअर सेंटर चार वर्षापासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावर अपघात झाल्यास रुग्णावर तातडीने उपचार व्हावे या उद्देशाने या सेंटरची निर्मिती करण्यात आली असूनही हे सेंटर अद्यापपर्यंत सुरु न झाल्याने अनेकांना आपले जीव गमवावे लागल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ट्रामा केअर सेंटर सुरु करण्यात यावे अशी मागणी स्थानिकांनी करुनही अद्यापपर्यंत हे सेंटर सुरु न करण्याची कारणे काय आहेत, तसेच सेंटर सुरु न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ट्रामा केअर सेंटर सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

ट्रॉमा केअर सेंटर पाचोड चे बांधकाम अपुर्ण असल्यामुळे इमारत अद्यापपर्यंत ताब्यात घेण्यात आलेली नाही. त्यामुळे ट्रॉमा केअर युनिट कार्यान्वित करण्यात आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) ट्रॉमा केअर युनिट पाचोडचे बांधकाम पूर्ण झालेले नसल्यामुळे, सदर ट्रॉमा केअर युनिटची इमारत ताब्यात घेण्यात आलेली नाही. त्यामुळे ट्रॉमा केअर युनिट सुरु करणे शक्य झालेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह मालाड आणि आजुबाजूच्या वन जमिनीवरील पुनर्वसनाबाबत

**(६३) * ४००५८ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह मालाड आणि आजूबाजूच्या वन जमिनीवर रहिवाश्यांचे निवासी पुनर्वसन करण्याकरिता संघर्ष नगर, चांदिवली, अंधेरी (पूर्व) येथील शासकीय जमीन मेसर्स सुमेर कॉर्पोरेशन या कंपनीस देण्यात आली असून या कंपनीने निवासी इमारत तसेच, शाळेची इमारत बांधली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच ठिकाणी बांधलेल्या शाळा इमारतीकरीता एका अन्य शाळेचे संचालक श्री.सुब्रतराव कांबळे यांनी वन विभागाकडे मागणी केली असता मुंबई उच्च न्यायालय याचिका क्रमांक ३०५/१९९५ अन्वये दिनांक १/१/१९९५ च्या आदेशान्वये सदर जमिनीवरील पुनर्वसन इमारती या केवळ वन जमिनीवरील निवासी पुनर्वसनाकरीता असल्याचे लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.विजयसिंह चौहान यांना वन विभागाने शाळा इमारत हस्तांतरित करण्याकामी ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे, एकाच प्रकारची मागणी असताना दोन वेगळे निर्णय व उत्तरे देवून गरीब प्रकल्पबाधित आणि विशिष्ट पुनर्वसनाकरिता असलेल्या इमारती, शाळा कोर्टाचा आदेश डावलून गैरव्यवहार झाला असल्याने नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री.चौहान यासारख्या अनेक गंभीर गुन्हे दाखल असलेल्या व्यक्तीस शाळा इमारत बांधण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची कारणे काय आहेत तसेच शाळा इमारतीची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

(२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर एज्युकेशन सोसायटीचे संचालक श्री.सम्रतराव कांबळे यांनी दिनांक ३१/०७/२०१५ रोजी वन विभागाकडे सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने त्यांना दिनांक ०५/०३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविण्यात आले आहे.

१. रिट याचिका क्र.३०५/९५ मध्ये पारित झालेल्या आदेशान्वये व्यावसायिक स्वरुपाच्या अतिक्रमकांना पुनर्वसनाचा लाभ देता येत नाही.
२. लिंबोणी निकेतन या शाळेस मा.उच्च न्यायालयाने त्यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ७४२/२००६ मध्ये निर्गमित केलेले आदेश हे लिंबोणी निकेतन संस्थेकरीता मर्यादित होते.

(३) हे खरे नाही.

लिंबोणी निकेतन या शाळेच्या संस्थाचालकांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ७४२/२००६ मध्ये दिनांक ०७/०४/२००६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार, वन विभागाचे निष्कर्षानुसार सदर शाळेबाबतचा विधीगत निर्णय घेणेसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास निर्देश दिले आहेत. सदर आदेशात निर्देशित केलेप्रमाणे लिंबोणी निकेतन शाळेच्या पुनर्वसनासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास वन विभागाचे अभिप्राय दिनांक १९/०६/२००७ रोजी सादर करण्यात आले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एज्युकेशन सोसायटीचे संचालक श्री.सम्रतराव कांबळे यांनी मा.उच्च न्यायालयात त्यांचे शाळेसाठी पर्यायी जागा मिळणेसंदर्भात रिट याचिका क्र. १८८८/२०१७ दाखल केलेली असून सदर याचिका न्यायप्रविष्ट असून निर्णयावर प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील शासकीय महाविद्‌यालय व रूग्णालयातील (घाटी) “सीव्हीटीएस” विभागातील कॅथलॅब बंद असल्याबाबत

**(६४) * ३९१३८ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील शासकीय महाविद्‌यालय व रूग्णालयातील (घाटी) “सीव्हीटीएस” विभागातील कॅथलॅब बंद असून वैदकीय साहित्याअभावी अँजिओप्लास्टीचे उपचार दोन महिन्यापासून बंद असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वसामान्य हृदयरोग रुग्णांना खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार घ्यावे लागत असल्याने आर्थिक अडचणीमुळे अनेक गरीब रुग्ण उपचारापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कॅथलॅब सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

याविषयी अँजिओप्लास्टीसाठी येणाऱ्या रुग्णांची औरंगाबाद मधील महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेशी संलग्नीत असलेल्या इतर रुग्णालयांमध्ये व्यवस्था करण्यात आली होती.

(३) कॅथलॅब कार्यरत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाची सुविधेअभावी दुरवस्था झाल्याबाबत

**(६५) * ३९२६८ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील सर्वात मोठे आशिया खंडातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय असून सदर रूग्णालयातील मुलभूत सुविधेअभावी दुरवस्था झाली असल्याचे दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णलयात सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हा रुग्णालयात आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्याबाबत

**(६६) * ४०५४१ श्री.रविंद्र फाटक, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा रुग्णालयात माहे एप्रिल, २०१७ मध्ये उपचारार्थ दाखल झालेल्या एका रुग्णाच्या नातेवाईकांनी शिकाऊ डॉक्टरांना केलेल्या मारहाणीमुळे रुग्णालयाच्या सुरक्षेसाठी ५० सुरक्षा रक्षकांची मागणी रुग्णालय प्रशासनासह स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच, माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान या रुग्णालयाच्या आवारात गर्दुल्ले आणि दारुड्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून बाह्यरुग्ण विभागाच्या काऊंटरवरुन ४१ हजार ७५५ रुपये चोरीला गेले होते व दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास नवजात अर्भकाचे अपहरण झाले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयात सीसीटीव्ही कॅमेरे, पोलीस बंदोबस्त असतानाही अर्भकांचे अपहरण होण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आरोपींना अटक करण्याबाबत व रुग्णालयात आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जिल्हा सामान्य रूग्णालयात शासनाच्या मंजूर मानकानुसार ४ पहारेकरी पदे मंजूर असून त्यापैकी २ पदे भरलेली आहेत व २ पदे रिक्त आहेत. कार्यरत २ पहारेकरी व वर्ग ४ चा १ कर्मचारी असे ३ कर्मचाऱ्यांना सकाळी ७.०० ते ३.०० व दुपारी ३.०० ते ११.०० व रात्री ११.०० ते ७.०० अशी ड्युटी लावली असताना रात्री ११.०० ते ७.०० या ड्युटीवरील कर्मचारी त्या दिवशी प्रकृती अस्वास्थामुळे गैरहजर होता. रूग्णालय सुरक्षेकरीता नियुक्त पोलीस बंदोबस्त अपघात कक्षाच्या बाहेर तैनात होता. प्रसूती विभागातून पहाटे ३.३० च्या सुमारास बाळ चोरीला गेले.

(४) सदर घटनेबाबत तातडीने पोलीस निरीक्षक, ठाणे नगर पोलीस ठाणे यांना कळविण्यात आले. सीसीटीव्ही फुटेजची मदत घेऊन चोरीस गेलेल्या अर्भकास शोधण्यात पोलिसांना यश आले. सदर अर्भकास तपासणीनंतर मातेकडे सोपविण्यात आले आहे.

सुरक्षेच्या अनुषंगाने सामान्य रूग्णालय, ठाणे येथे २० सुरक्षा रक्षक नेमण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे देवडे अधिष्ठीवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील जि.प. शाळा क्र. १ च्या आवाराची कंपाऊंड वॉल बाहेर खाजगी वापरासाठी सोडण्यात आल्याबाबत

**(६७) * ३९०४४ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवडे अधिष्ठीवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील जि.प. शाळा क्र. १ च्या आवाराची रितसर मोजणी झाली असतांनाही जवळजवळ १० फूट जागा कंपाऊंड वॉल बांधताना जिल्हा परिषदेच्या परवानगीशिवाय मुळ हद्दीच्या बाहेर खाजगी वापरासाठी सोडण्यात आल्याबाबतच्या चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी सुरु असतांना ग्रामपंचायतीने गट विकास अधिकाऱ्यांना चुकीची माहिती पुरविल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनास प्राप्त झालेल्या चौकशी अहवालात चुकीची माहितीची नोंद करुन अहवाल तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने चुकीची माहिती पुरविणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय हे खरे आहे.

ग्रामपंचायतीने शाळेची संरक्षक भिंत बांधकाम करण्यापूर्वी शाळेच्या परिसरामधून ग्रामस्थांना ये-जा करण्याच्या रस्त्यावर संरक्षण भिंत बांधकामामुळे रस्ताबंद झाल्यास ग्रामस्थांसाठी मोठी समस्या निर्माण झाली असती. त्यामुळे, स्थानिक ग्रामस्थ व शाळा व्यवस्थान समितीच्या बैठकीत भिंत बांधतांना ग्रामस्थांसाठी जाणे-येण्यासाठी रस्त्याची जागा सोडून शाळेची

संरक्षण भिंत बांधण्यात यावी. असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे, शाळेची संरक्षण भिंत बांधकामासाठी जिल्हा परिषदेची परवानगी घेण्यात आली नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणासाठी वनराई बंधारे बांधण्याबाबत

**(६८) * ३९०३७ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणाची प्रभावी उपाययोजना म्हणून लोकसहभागातून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ८ हजार ४५० वनराई बंधारे बांधण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परंतु प्रशासनाच्या निष्क्रीयतेमुळे आतापर्यंत संपूर्ण जिल्ह्यात केवळ १ हजार ७४० बंधारे बांधण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुषंगाने सदरील वनराई बंधाऱ्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासोबतच, या कामात उदासिनता दाखविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

कोणतेही उद्दिष्ट देण्यात आलेले नव्हते मात्र रत्नागिरी जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात लोकसहभागातून वनराई, कच्चे व विजय बंधारे यास्वरूपाचे एकूण ५५१४ बंधारे बांधण्यात आले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रामपूर (ता.डहाणू, जि.पालघर) ग्रामपंचायतीने इंदिरा आवास योजनेतून आदिवासी महिलेस बांधून दिलेले घरकुल जमीनदोस्त झाल्याबाबत

**(६९) * ३८४५८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामपूर (ता.डहाणू, जि.पालघर) ग्रामपंचायतीने सन २०१० मध्ये धर्मी लखमा कोठारी या आदिवासी महिलेस इंदिरा आवास योजनेतून बांधून दिलेले घरकुल दिनांक १३ नोव्हेंबर, २०१७ रोजी जमीनदोस्त झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बेघर झालेल्या आदिवासी महिलेस आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

तथापि, योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार घरकुलाचे बांधकाम लाभार्थ्यांने स्वत: करावयाचे आहे व घरकुल बांधून देण्यात येत नाही.

(२) होय.

घराच्या भिंतीना तडे जाऊन मोडकळीस आली असल्याचे आढळून आले आहे. प्रथम चौकशी अहवालानुसार श्रीमती धर्मी लखमा कोठारी यांना कोणीही वारस नसल्याने सदर घरकुलाचा ताबा हा श्रीमती धर्मी यांच्या भावाची मुलगी श्रीमती मंजूळा गणपत गोरवाला, राहणार ग्रा. प. जामशेत तालुका डहाणू यांनी घेऊन ते कुटुंबासह वास्तव्य करुन राहत होते. तहसिलदार डहाणू यांचे पत्र क्र.महसूल/संकीर्ण/नै.अ/कावि-७२४ दिनांक १४/१/२०१७ च्या अहवालान्वये श्रीमती मंजूळा गणपत गोरवाला मदत देणेस पात्र नसल्याचे कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पळसा (ता.हदगाव, जि.नांदेड) येथे अंगणवाडयांची दुरवस्था झाल्याबाबत

**(७०) * ३८५३९ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळसा (ता.हदगाव, जि.नांदेड) येथे तेराव्या वित्त आयोगांतर्गत सन २०१३-१४ मध्ये दोन अंगणवाडी खोल्यांचे बांधकाम पुर्ण करण्यात आले परंतु सदर कामे निकृष्ट दर्जाची असून या दोन्ही अंगणवाडयांची दुरवस्था झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पळसा हे गांव नागपूर महामार्गावर असुन या गावाची लोकसंख्या १२ हजाराच्यावर असुन तेथे एकुण पाच अंगणवाडयांमधून ५०० हुन अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत परंतू पळसा येथील अंगणवाडीमध्ये बसण्यासाठी अंगणवाडीच नसल्याने लहान विद्यार्थी उघडयावर शिक्षण घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पळसा येथे अंगणवाडया बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सन २०१२-१३ या वर्षात १३ व्या वित्त आयोगाअंतर्गत अंगणवाडी क्रमांक ३ आणि अंगणवाडी क्रमांक ५ ला अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामे मंजूर करण्यात आली. निधी उपलब्ध करुन ग्रामपंचायतीमार्फत बांधकामे पूर्ण करण्यात आले परंतु संबंधित ग्रामपंचायतीने दोन्ही अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम विहित मुदतीत पूर्ण केले नाही व त्या अंगणवाडी केंद्र इमारतीचा ताबा दिलेला नाही. याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव चौकशी करीत आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

मौजा पळसा, ता.हदगांव, जि.नांदेड येथे एकूण ५ अंगणवाडी केंद्र मंजूर आहेत. अंगणवाडी केंद्र क्रमांक १,२,४ ला स्वतंत्र इमारती आहेत. अंगणवाडी केंद्र क्र. २ च्या इमारतीत अंगणवाडी केंद्र क्र. २ व ३ एकत्र भरविण्यात येतात व अंगणवाडी केंद्र क्र. ४ च्या इमारतीत अंगणवाडी केंद्र क्र.४ व ५ एकत्र भरविण्यात येतात. अंगणवाडीतील बालके उघडयावर शिक्षण घेत नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील कोयना धरणाच्या डाव्या तीरावर उभारण्यात आलेल्या पंडीत जवाहरलाल नेहरु या उद्यानाची दुरवस्था झाल्याबाबत

**(७१) * ३८९७१ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कोयना धरणाच्या डाव्या तीरावर उभारण्यात आलेल्या पंडीत जवाहरलाल नेहरु या उद्यानात मोठया प्रमाणात पर्यटक येत असून या उद्यानाची दुरवस्था झाली असल्याचे तसेच तेथे कोणत्याच सुविधा नसल्याचे माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने सदरहू उद्यानात पर्यटकांना विविध सुविधा पुरविण्याबाबत तसेच उद्यानाची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

सातारा जिल्ह्यातील कोयना धरणाच्या उजव्या तीरावर पंडीत जवाहरलाल नेहरु उद्यान उभारण्यात आले असून, तेथे मोठ्या प्रमाणात पर्यटक भेट देतात, तेथे आवश्यक सुविधा पुरविण्यात आल्या असून उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत देखभाल दुरुस्तीची कामे पार पाडली जातात.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोरगांव मंजू (जि.अकोला) येथे राष्ट्रीय महामार्गावर अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना ग्रामीण रुग्णालयास जागा अपुरी पडत असल्याबाबत

**(७२) * ३८१३८ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगांव मंजू (जि.अकोला) येथे राष्ट्रीय महामार्गावर अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना तातडीने उपचार मिळावेत यासाठी मंजूर करण्यात आलेले ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय जागा अपुरी पडत असल्याने गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोरगांव मंजू येथे ग्रामीण रुग्णालय व्हावे ही गेल्या दहा वर्षापासूनच्या मागणीची/आंदोलनाची दखल घेऊन सन २०१५ मध्ये ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर झाले परंतु इमारत बांधकामास जागा अपुरी पडत असल्याने व रुग्णालयाची वास्तू मांडणी आराखडा नसल्याने रुग्णालय सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्रामीण रुग्णालय सुरु होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) बोरगाव मंजू, जिल्हा अकोला येथे ३० खाटांचे ग्रामीण रूग्णालय दिनांक १७/०१/२०१३ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आले आहे. सदरचे गाव हे जिल्ह्यातील मोठी बाजारपेठ असल्यामुळे जागेच्या वाढत्या भावामुळे व

प्रचलित मापदंडानुसार ग्रामीण रूग्णालयाकरीता ४ एकर जमीन शहरानजिक उपलब्ध झालेली नाही. सद्य:स्थितीत सदर ग्रामीण रूग्णालयासाठी प्राप्त झालेल्या ०.८१ हेक्टर जमिनीत रूग्णालयाचे बांधकाम करण्याकरीता रूग्णालयाचे अंदाजपत्रक व आराखडे यांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुर्गम भागात रुग्णासाठी पुरेशा प्रमाणात रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७३) * ३९२८४ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्तीसगड मधील दुर्गम भागातील महिलेस आजारावरील उपचाराकरिता रुग्णवाहिका न मिळाल्यामुळे खाटेची कावड करुन ६० किलोमीटर अंतर ३ दिवस पायी चालून लाहोरी येथील प्राथमिक केंद्रात दाखल केल्याची घटना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील दुर्गम भागात रुग्णासाठी पुरेशा प्रमाणात रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

छत्तीसगड राज्यातील गडकल गावातील दीर्घकाळ गंभीर आजारी महिला श्रीमती मरी पुंगाटी यांना दिनांक ०९/०२/२०१८ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र लाहेरी येथे खाटेवर आणण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्याच्या हद्दीवर असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील उपकेंद्र बिनागुंडा ते प्राथमिक आरोग्य केंद्र लाहेरी यातील अंतर २० कि.मी असून ये-जा करण्यासाठी कच्चा रस्ता असून नदीनाल्यांनी व्यापलेला असा दुर्गम भाग आहे. त्यामुळे तेथील परिसरातील रूग्ण हे पायीच ये-जा करतात व गंभीर रूग्णांना खाटेवर आणले जाते.

(२) तालुका आरोग्य अधिकारी, भामरागड यांनी केलेल्या चौकशीत रूग्णाला प्राथमिक आरोग्य केंद्र लाहेरी येथे योग्य ते उपचार देऊन पुढील उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय, भामरागड येथे शासकीय रूग्णवाहिकेतून संदर्भित करण्यात आले होते. सदर रूग्ण महिलेवर उपचार केल्यावर रूग्णाची स्थिती सुधारत होती. त्यामुळे दुसऱ्या दिवशी पुढील उपचाराकरीता उपजिल्हा रूग्णालय, अहेरी किंवा जिल्हा रूग्णालय गडचिरोली येथे संदर्भित होण्यास रूग्ण इच्छुक नव्हता. त्यामुळे सदर रूग्णास त्याच्या मर्जीने हेमलकसा येथील लोकबिरादरीच्या रूग्णालयात नेण्यात आले.

राज्यातील दुर्गम भागात आरोग्य सेवा पुरविण्याच्या दृष्टीने १७३ मोबाईल मेडिकल युनिट तसेच टोल फ्री क्रमांक १०८ आपत्कालीन रूग्णवाहिका सेवा उपलब्ध आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानवी तस्करी रोखून देहविक्रीच्या जाळयात अडकलेल्या पीडितांच्या पुनर्वसनाबाबत

**(७४) * ३९६८५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवी तस्करी रोखून देहविक्रीच्या जाळयात अडकलेल्या पीडितांच्या पुनर्वसनासाठी राज्य शासनाने योजना आखण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पीडितांच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अर्थसंकल्पात मंजूर करुन वितरित केलेला निधी विभागांनी खर्च न केल्याबाबत

**(७५) * ३९७८७ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जयंत पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधील केवळ ३३% निधी माहे डिसेंबर, २०१७ पर्यत खर्च झाल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याचे एकूण बजेट ३ लाख ६९ हजार १८५.३१३ कोटी असून राज्याच्या अर्थसंकल्पाला २०% कट लावून जेवढे पैसे वित्त विभागाकडून मिळाले ते देखील पूर्णपणे खर्च करण्यास अनेक विभागांना अपयश आल्याने राज्याच्या विकास योजना कागदावरच राहिल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) आर्थिक वर्ष संपण्यास केवळ दोन महिनेच शिल्लक असताना विशेष करून सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, गृहनिर्माण, अन्न व नागरी पुरवठा, अल्पसंख्याक, पर्यावरण, पाणीपुरवठा व आदिवासी विभागांनी १०% निधी देखील खर्च केलेला नाही ही बाब वित्त विभागाने घेतलेल्या आढाव्यात निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वित्त विभागाने निधी उपलब्ध करूनही तो विकासकामास खर्च न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, निधी उपलब्ध होवूनही तो खर्च न झाल्याप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सर्व विभागांना निधी खर्चाबाबत कोणते निर्देश देण्यात आले आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३), (४) व (५) महसूली जमा व उभारण्यात येणारे कर्ज हे टप्प्या-टप्प्याने प्राप्त होत असल्याने प्रशासकीय विभागांना अर्थसंकल्प अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) मासिक निधी विवरणपत्र तयार करुन निधी उपलब्ध करणे ही प्रचलित पध्दत आहे. वर्षाच्या सुरुवातीला प्रशासकीय विभागांना त्याप्रमाणे माहे डिसेंबर-२०१७ अखेरपर्यंत महसूली खर्चाच्या ७०% व भांडवली खर्चाच्या ८०% एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता.

डिसेंबर-२०१७ पर्यंतच्या पुरवण्या मागण्यांसहित सन २०१७-१८ चे अर्थसंकल्पीय अंदाज रुपये ३,५०,३९१ कोटी (निव्वळ) इतके आहेत. डिसेंबर, २०१७ अखेर महालेखापाल कार्यालयाच्या मासिक वित्तिय लेख्यामध्ये रुपये १,७४,९१४ कोटी इतका खर्च झालेला असून त्या खर्चाची अर्थसंकल्पीत निधीशी टक्केवारी ५०% इतकी येते.

सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग इत्यादी विभागांकडील मोठ्या प्रमाणावरील कामांच्या खर्चाची बिले बीम्स प्रणालीवर दिसत नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभाग (Hybrid Annuity वगळून), जलसंपदा विभाग व अन्न व नागरी पुरवठा विभाग या विभागांना वितरीत केलेल्या तरतूदीपैकी अनुक्रमे ६८%, ७८% व ५३% इतका खर्च झालेला आहे. पाणीपुरवठा विभाग व आदिवासी विकास विभागाकडे मोठ्या प्रमाणावर केंद्र पुरस्कृत योजनांसाठी निधी अर्थसंकल्पीत असून अपेक्षित केंद्रीय निधी न मिळाल्याने तो व समरुप राज्य हिस्सा खर्च झाला नाही. त्यामुळे या विभागांचा खर्च कमी दिसत आहे. अल्पसंख्यांक विकास विभागांतर्गत शिष्यवृत्ती योजने अंतर्गत अर्जांची छाननी, बांधकामाच्या निविदा व इतर प्रक्रिया सुरु असणे, अपेक्षित केंद्रीय निधी प्राप्त न होणे, गृह निर्माण विभागांतर्गत कोकण मंडळाकडे प्रधानमंत्री आवास योजनेच्या नकाशांना स्थानिक प्राधिकारणांकडून वेळेत मंजूरी प्राप्त न झाल्याने तसेच अमरावती मंडळांतर्गत घरकुल योजनेंतर्गत योजनेचे निकष, शहराची व्याप्ती, लाभार्थ्यांची मानसिकता व घरकुल बांधण्यास लागणारा अतिरिक्त निधी इत्यादी अडचणीमुळे या विभागाचा खर्च कमी दिसतो.

राज्याच्या अर्थ व्यवस्थेमध्ये पर्जन्यमानाचा मोठा वाटा असून पावसाळा संपल्यानंतर मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेण्यात येतात. त्यामुळे राज्यामध्ये माहे ऑक्टोबर ते माहे मे या कालावधीमध्ये खर्च करण्याचा कल दिसून येतो. त्यामुळे अर्थसंकल्पीत निधीपैकी वेतन, निवृत्तीवेतन, व्याज व कर्जाची परतफेड याव्यतिरिक्त होणारा खर्च हा वित्तीय वर्षाच्या शेवटच्या ३ महिन्यात मोठ्या प्रमाणावर करण्यात येतो. प्रशासकीय विभागांनी खर्चाचे प्रमाण योग्यरित्या नियोजित करावे व दर तीन महिन्यांनी सचिवस्तरावर आढावा घ्यावा तसेच वर्षाच्या शेवटच्या महिन्यात प्रमाणाबाहेर खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना वेळोवेळी देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## पाडळसरे (ता.अंमळनेर, जि.जळगाव) येथील उपसा सिंचन योजना निधी अभावी बंद असल्याबाबत

**(७६) * ४०१८५ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाडळसरे (ता.अंमळनेर, जि.जळगाव) निम्न तापी प्रकल्पावर आधारित साने गुरुजी सहकारी उपसा सिंचन योजना, बोहरे ही उपसा सिंचन योजना निधी अभावी बंद असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपसा सिंचन योजना शासकीय खर्चाने चालविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्ताव प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) सदर उपसा सिंचन योजना सहकारी तत्वावर असून दुरुस्ती व निधी अभावी बंद आहे.

(२) सिंचन योजना, बोहरे या योजनेची दुरुस्ती करुन कार्यान्वित करण्याचा रुपये ७३८.४१ लक्ष किंमतीचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास प्राप्त असून त्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीपथावर आहे.

(३) प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीपथावर असून दिनांक २०/१२/२०१७ रोजी प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सहमतीकरिता नियोजन विभागास सादर केला आहे.

(४) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशिम वन विभागातील वनक्षेत्रपाल व वनपाल यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(७७) * ४०२२९ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम वन विभागातील श्री.नंदुरकर, वनक्षेत्रपाल व श्री.थोरात, वनपाल यांनी गैरकृत्य व गैरव्यवहार केल्याबाबत त्यांना निलंबित करुन त्यांची मुद्देनिहाय चौकशी करण्याबाबतची तक्रार शासनाकडे प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच याबाबत वाशिम येथील विविध मागासवर्गीय संघटनांनी दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी श्री.नंदुरकर (R.F.O.) यांना त्वरीत निलंबित करुन त्यांच्या गैरकृत्याची विभागीय चौकशी करण्यासाठी शासनाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुद्देनिहाय चौकशी अहवाल शासनाकडे प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) मागासवर्गीय संघटनांनी तक्रार उप वनसंरक्षक (प्रा.), अकोला तसेच मुख्य वनसंरक्षक (प्रा.), यवतमाळ यांच्याकडे प्राप्त झालेली आहे. तथापि शासनाकडे सदर तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), यवतमाळ यांच्या आदेशानुसार क्षेत्रिय स्तरावर केलेल्या चौकशीनुसार, महिला वनरक्षकाने केलेल्या तक्रारीमध्ये श्री.नंदुरकर, वनक्षेत्रपाल (प्रा.), वाशिम हे दोषी आढळून आले नाहीत. अवैध सागवान जलतन ट्रकद्वारे वाहतूक प्रकरणी श्री.ए.एच. थोरात, वनपाल (सध्या सेवानिवृत्त) यांना जप्त वनोपजाचे चुकीचे मोजमाप घेतल्या प्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. तसेच संबंधित दोषींविरुध्द प्रकरण न्यायप्रविष्ठ करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त रिलायन्स जियो प्रकरणी कंपनीविरुध्द दिनांक ०३/१२/२०१७ अन्वये प्राथमिक गुन्हा दाखल करुन खोदकामाकरीता वापरण्यात आलेले वाहन व साहित्य जप्त करण्यात आले असून वनक्षेत्रपाल (प्रा.), वाशिम यांच्या स्तरावर पुढील चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक व ठाणे जिल्हा रूग्णालयात शेकडो नवजात बालकांचा मृत्यू झाल्याबाबत

**(७८) * ३८६९० श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५४३२ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात इन्क्युबेटर, व्हेंटिलेटर यासह अनेक वैद्यकीय सुविधा व तज्ञ डॉक्टर नसल्यामुळे माहे एप्रिल ते ऑगस्ट, २०१७ या पाच महिन्यांत २२७ नवजात बालकांचा मृत्यू झालेला असून ठाणे सिव्हिल रूग्णालयात याच कारणांमुळे ४७ बालकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शासकीय रूग्णालयात अपुऱ्या सुविधा व तज्ञ डॉक्टर नसल्यामुळे सन २०१६-१७ मध्ये सुमारे १४ हजार ३६५ नवजात बालकांचे मृत्यू झाले आहे, तर ७८ हजार ४३२ बालकांची परिस्थिती बिकट आहे, तसेच मातांचे मृत्यूचे प्रकार वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने आश्वासन दिल्याप्रमाणे किती शासकीय रूग्णालयात इन्क्युबेटर, व्हेंटीलेटर यासह अनेक वैद्यकीय सुविधा व तज्ञ डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची असलेली रिक्त पदे भरण्यात आली आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत** : (१) हे अंशत: खरे आहे.

नाशिक जिल्हा रुग्णालयातील एसएनसीयुमध्ये माहे एप्रिल ते ऑगस्ट, २०१७ या कालावधीत १४९० गंभीर आजारी नवजात अर्भके दाखल झाली असून त्यापैकी २२७ बालकांचा उपचारा दरम्यान दुर्देवी मृत्यू झाला.

ठाणे जिल्हा रुग्णालयाच्या विशेष नवजात काळजी कक्षामध्ये माहे एप्रिल ते ऑगस्ट, २०१७ या कालावधीत ७३८ गंभीर आजारी नवजात अर्भके दाखल झाली असून त्यापैकी ४७ बालकांचा उपचारा दरम्यान दुर्देवी मृत्यू झाला.

नाशिक व ठाणे येथील विशेष नवजात शिशू काळजी कक्षात व्हेन्टींलेटर अपेक्षित नाही. तथापि, तेथे फोटोथेरपी युनिट, ऑक्सीजन हुड, इनफ्युजन पंप, रेडियंन्ट वॉर्मर, लॅरिगोस्कोप आणि इंडोट्रकीयेल टयुब्स, नेजल कॅन्युला, बॅग, मास्क आणि वेईग स्केल इत्यादी उपकरणे उपलब्ध आहेत. सद्य:स्थितीत नाशिक येथील विशेष नवजात शिशू काळजी कक्षांमध्ये १ बालरोग तज्ञ, ३ वैद्यकिय अधिकारी व ३१ स्टाफ नर्स तसेच ठाणे येथील विशेष नवजात शिशू काळजी कक्षांमध्ये १ बालरोग तज्ञ, २ वैद्यकिय अधिकारी व ६ स्टाफ नर्स कार्यरत आहेत.
(२) हे खरे नाही,

सन २०१६-१७ मध्ये १३८२८ नवजात बालकांचे (० ते २८ दिवस) मृत्यू झालेले आहेत तसेच १२२९ माता मृत्यू झालेले आहेत. सदर मृत्यू शासकीय रुग्णालयात अपुऱ्या सुविधा व तज्ञ डॉक्टर नसल्यामुळे झालेले नाहीत.

(३) जिल्हा रुग्णालयाच्या एसएनसीयुमध्ये व्हेंटिलेटरची सुविधा अपेक्षित नाही. राज्यातील ३६ एसएनसीयुमध्ये एकूण ७१५ रेडियंट वॉर्मर उपलब्ध आहेत.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे राज्यातील ३६ एसएनसीयु मधील कामकाज सुरळीत चालण्यासाठी स्टाफ नर्सची अतिरिक्त पदे मंजुर करण्यात आली आहेत. तसेच, राज्यातील एसएनसीयु कक्षामध्ये बालरोग तज्ञ, वैद्यकिय अधिकारी व स्टाफ नर्स यांची बहुतांशी पदे भरलेली असून रिक्त असलेली पदे तातडीने भरण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धामणी (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) प्रकल्पाचे काम प्रलंबित राहिल्याबाबत

**(७९) * ३७८८४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गगनबावडा, राधानगरी, पन्हाळा या तीन तालुक्यांना वरदान ठरणारा (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) राई मधील धामणी प्रकल्प गेल्या १७ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धामणी प्रकल्पाचे काम पुर्ववत सुरु करुन पुर्ण करण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही. धरणाचे सुमारे ७५% मातीकाम पूर्ण झाले आहे. सिंचन तथा विद्युत विमोचकाच्या शुष्क विहिरीतील आपातकालीन द्वार व शीघ्रगतीने बंद होणाऱ्या द्वाराच्या अंतस्थ निविष्ट भागाचे उभारणी काम पूर्ण झाले असून वायपीस, ट्रॅशरॅक व सेवाद्वाराच्या अंतस्थ निविष्ट भागांची उभारणी पूर्ण झाली आहे. सांडव्याचे खोदकाम ५० टक्के पूर्ण झाले आहे. तथापि, प्रकल्पाच्या घळभरणीचे काम प्रामुख्याने पुनर्वसनाच्या अडचणीमुळे मे, २०१३ पासून प्रलंबित आहे.

(२) धामणी मध्यम प्रकल्पास शासन निर्णय क्र.सुप्रमा २०१६/४४६/(प्र.१७०/१६)/म.प्र. दिनांक १३/१०/२०१६ अन्वये रुपये ७८२.३७ कोटी रकमेस व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. धरण पायामधील राई गावातील अतिक्रमित २६ घरांच्या खास बाब प्रस्तावास दिनांक ३१/०१/२०१८ रोजीच्या महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ९६ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. शेतकऱ्यांना पर्यायी जमीनीचे वाटप होण्यासाठी महसूल विभागासोबत बैठका घेण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारती धोकादायक असल्याबाबत

**(८०) * ४००७१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २५ शाळांच्या इमारती धोकादायक असल्याचा अहवाल येथील शिक्षण विभागाने दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे येथील विद्यार्थी जीव मुठीत धरुन तेथे शिक्षण घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शाळांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

वसई तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ९ प्राथमिक शाळांच्या इमारती धोकादायक असल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्यामुळे अशा शाळेतील विद्यार्थी वर्गासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही. शाळा वर्ग भरविण्यासाठी पर्यायी जागेची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

(३) जिल्हा परिषदेच्या ४ शाळा भारोळ, पळीपाडा, वडघर आणि आडणे येथे अतिरिक्त वर्ग खोल्यांचे बांधकाम प्रगतीपथावर सुरु आहे. जिल्हा परिषदेच्या उर्वरित प्राथमिक शाळांच्या धोकादायक इमारती निर्लेखन करुन नवीन वर्ग खोल्या बांधकामे मंजूरीसाठी सन २०१८-१९ च्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकात प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जलसंपदा विभागाने व्यावसायिक वापरासाठी पाण्याची दरवाढ केल्याबाबत

**(८१) * ३९१३० श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धरणातून शेती, पिण्याचे पाणी, औद्योगिक वापर इत्यादीसाठी पुरविण्यात येणाऱ्या पाण्याच्या दरात वाढ करण्याचा निर्णय दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला असून सदर दरवाढ १७% पासून ५०% पर्यंत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केंव्हापासून करण्यात येणार आहे,

(३) तसेच राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने सदरील दरवाढीमुळे रब्बी हंगामापूर्वीच शेतकरी अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील पाणी दरवाढीत ग्रामीण भागातील गरीब शेतकरी व शहरातील गरीब वस्त्यांमध्ये राहणाऱ्यांना पाणी दरात सुट देण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने त्यांचे दिनांक ११/०१/२०१८ चे आदेशान्वये महाराष्ट्र राज्यात घरगुती, औद्योगिक व कृषी-सिंचन प्रयोजनार्थ वापरल्या जाणाऱ्या पाण्यासाठी ठोक जलदराचे पुनर्विलोकन व सुधारणा केली आहे.

(२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार प्राधिकरणाने उक्त निर्णय घेतला आहे.

सदर दर हे बिगर सिंचनासाठी ०१/०२/२०१८ पासून तर सिंचनासाठी येणारा उन्हाळी हंगाम म्हणून ०१/०३/२०१८ पासून लागू करण्यात आले आहेत.

(३) रब्बी हंगामासाठीचे दरवाढ केली नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेसाठी जनजागृतीचे काम करणाऱ्या लोककला पथकांचे मानधन थकीत असल्याबाबत

**(८२) * ३९३४० श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेसाठी जनजागृतीचे काम करणाऱ्या मुंबईतील ३९ लोककला पथकांचे रुपये ३० लाख मानधन शासनाकडे थकीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी वाचवा, पर्यावरण, प्रदूषण, स्त्रीभ्रूण हत्या, दारु, तंबाखू व गुटखा व्यसनमुक्ती अशा विविध सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करण्याकरिता शासन लोक कलावंताच्या कलेचा वापर करुन घेत असतांना त्यांना मानधन देण्यासाठी शासकीय यंत्रणेकडून विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कलावंताचे मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.
सद्य:स्थितीत सर्व ३९ कलापथकांना रक्कम रुपये ८०,०००/- प्रति कलापथक प्रमाणे एकूण रुपये ३१.२० लक्ष इतके मानधन अदा करण्यात आलेले आहे.
आरोग्य विभागाशी संबंधित विषयाबाबात मानधन देण्यास विलंब झालेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) तालुक्यातील वनक्षेत्रात जलसंधारणाची कामे करण्याबाबत

**(८३) * ३९२४६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील वन्यजीवांसाठी आहेरवाडी, जायदरे, सोमठाणजोश, भारम, कोळम इत्यादी ठिकाणी वनतळे मृद व जलसंधारणाची कामे करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास उपवनसंरक्षक, नाशिक यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने येवला तालुक्यातील वनक्षेत्रात वनतळे, सिमेंट बंधारे, सीसीटी इत्यादी जलसंधारणाची कामे करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जुलै महिन्यात उप वनसंरक्षक, पूर्व भाग नाशिक यांच्याकडे पत्रान्वये मागणी केलेली आहे.

(२) विविध योजनेंतर्गत सन २०१६-१७ पर्यंत प्राप्त झालेल्या निधीतून येवला तालुक्यातील आहेरवाडी-२ वनतळे, जायदरे-१० वनतळे, सोमठाणजोश-२३ वनतळे, १ डिपसीसीटी, ५ सिमेंट नालाबांध, ७० लहान मातीबांध, कोळम येथे १० वनतळे अशी एकुण-१२१ मृद व जलसंधारणाची कामे करण्यात आलेली आहे. भारम येथे मृद व जलसंधारणाची कामे करण्यास वाव नसल्याने कामे घेण्यात आलेली नाही.

सन २०१७-१८ मध्ये जलयुक्त शिवार अभियानातील समाविष्ट येवला तालुक्यातील एकुण ६ गावात मृद व जलसंधारणाची १० कामे प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागभीड (जि.चंद्रपूर) येथील रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या मजूरांना वेतन मिळत नसल्याबाबत

**(८४) * ४०३७० प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागभीड (जि.चंद्रपूर) येथील रोजगार हमी योजनेची विविध कामे ३ हजार मजूरांकडून करुन घेतली जात असून त्यांना नियमित वेतन मिळत नसल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती खराब असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकित मानधन तसेच इतर रास्त मागण्यांसाठी मनरेगा कंत्राटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मजूरांना त्यांचे नियमित वेतन व मानधन न देणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) व (२) होय. हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) योजनेंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नोव्हेंबर-डिसेंबर पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले आहे. तसेच मजूराची मजूरी वेळेवर मिळत आहे.

-----------------

## कोढे कळवंडे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(८५) * ४०११८ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून कोढे कळवंडे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मागील वर्षात २२ वाघांचा मृत्यू झाल्याबाबत

**(८६) * ३९०३९ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशात वाघांच्या संवर्धनासाठी भर दिला जात असताना मागील वर्षात राज्यात २२ वाघांचा मृत्यू झाल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाघांच्या या मृत्यूंची गंभीर दखल घेवून वाघांचे मृत्यू रोखणे व त्यांचे संवर्धन करणेबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) राज्यात जानेवारी, २०१७ ते डिसेंबर, २०१७ या कालावधीत नैसर्गिकरीत्या ०९ शेतात लावलेल्या विद्युत प्रवाहामुळे ०५, आपसी झुंजीत २, वाहन अपघातात १ तर इतर ५ असे एकूण २२ वाघांचे मृत्यू झालेले आहेत.
(२) व (३) राज्यात वाघांचे होणारे मृत्यू रोखण्याकरीता व त्यांचे संवर्धनासाठी क्षेत्रियस्तरावर खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- पेंच व्याघ्र प्रकल्प, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प येथे विशेष व्याघ्र संरक्षण दल तयार करण्यात आलेले आहेत.
- महाराष्ट्र राज्यातील वनविभागात Call details records (CDR) ची Live Tower Location (LTL), Tower Dump Data (TDD) माहितीचे विश्लेषण करण्याकरीता Cyber Cell गठीत करण्यात आले आहे.
- वाघांच्या हालचालीचा मागोवा घेण्याकरीता त्यांचे जाणे-येण्याच्या संभावित रस्त्यावर, पानस्थळाजवळ नियमितपणे कॅमेरा ट्रॅप लावण्यात येतात.
- जंगलात आवश्यक त्या ठिकाणी संरक्षण मनोरे उभारलेले आहेत. संरक्षित क्षेत्रात संरक्षण कुट्यांची उभारणी केली आहे.
- प्रकल्प क्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी तपासणी नाके असून त्याद्वारे वाहनांची तपासणी करण्यात येते
- वन कर्मचाऱ्यांना पिस्तुल / रायफल सारख्या शस्त्रांचा पुरवठा केलेला आहे.
- शिकाऱ्याबाबत गोपनियरीत्या माहिती संकलीत करण्यात येते. खबऱ्याला बक्षिस देण्यासाठी गुप्त सेवा निधीची तरतूद केलेली आहे.
- सर्व व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात वायरलेस यंत्रणा कार्यान्वित आहेत.

- श्वान पथक ठेवण्यात आले असून त्यांच्याद्वारे संशयास्पद ठिकाणी वन्यप्राण्यांचे अवयवांचा अवैध व्यापार, वाहतुक याचा शोध घेण्यात येतो.
- जिल्हा व्याघ्र कक्ष समन्वय समिती अंतर्गत विद्युत प्रवाहाव्दारे होणाऱ्या शिकारीच्या घटनांवर सनियंत्रण ठेवण्यात येते व वनक्षेत्रातून गेलेल्या विदयुत लाईनवर गस्त करण्यात येते.
- अपघाती मृत्यूला आळा घालण्यासाठी वाहतुकीच्या रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत गतीरोधक व विविध ठिकाणी वेग मर्यादा पालन करण्याच्या सूचना फलक लावण्यात आलेले आहे.
- नियमीत गस्तीद्वारे वन्यप्राण्यांच्या हालचालींचे संनियंत्रण करण्यात येते. याकरीता साधन सामुग्री जसे कॅमेरा ट्रॅप, दुर्बिन व जीपीएस यांचा वापर करण्यात येतो.
- स्थानिक क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी, फिरते पथक, संरक्षण पथक यांचेमार्फत क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येते.
- बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित असून तात्काळ संपर्काकरिता वाहनांवर वायरलेस संच बसविण्यांत आलेले आहेत. क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी यांना वॉकी टॉकी संच पुरविण्यात आलेले आहेत.
- लोकांनी जंगलात जाऊ नये व मानव-वन्यजीव संघर्ष होऊ नये म्हणून उपलब्धतेनूसार गावकऱ्यांना निस्तार दरावर फाटे, बांबू व सरपण उपलब्ध करुन देण्यात येते.
- ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे व मानव वन्यजीव संघर्षाला आळा बसावा म्हणून व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील गावातील कुटूंबांना, अभयारण्य व राष्ट्रीय उद्यान क्षेत्राचे लगत २ कि.मी. वरील गावातील कुटूंबांना तसेच प्रादेशिक वनविभागातील क्षेत्रामध्ये वाघांचा भ्रमंतीमार्ग (Corridor) क्षेत्राच्या गावातील कुटूंबांना डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनांतर्गत एलपीजी गॅस पुरवठा करण्यात येत आहे.

-----------------

## जुनी-जव्हार ग्रामपंचायत (ता.जव्हार, जि.पालघर) येथील लाभार्थ्यांना घरकुल न देता त्यांचे मंजूर झालेले पैसे परस्पर काढून घेतल्याबाबत

**(८७) * ३८४६० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, अ‍ॅड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुनी-जव्हार ग्रामपंचायत (ता.जव्हार, जि.पालघर) हद्दीतील कशीवली नं. २ येथील रहिवाशी गोंविंद भाऊ भुसारा व त्यांचे सोबत ४ लाभार्थी अशा एकूण ५ लाभार्थ्यांना घरकुल न देता त्यांचे मंजूर झालेले पैसे ग्रामपंचायतीने परस्पर काढून घेतल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड शहर व परिसरातील बोगस पॅथॉलॉजी लॅबवर कारवाई करण्याबाबत

**(८८) * ३८५५१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने अनधिकृतरित्या सुरु असलेल्या पॅथॉलॉजी लॅब तात्काळ बंद कराव्यात असे आदेश दिले असतांनाही नांदेड शहर व परिसरात बोगस पॅथॉलॉजी सुरु असल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरु असतांना संबंधित यंत्रणा मात्र याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन व शोधमोहिम राबवून येथील बोगस पॅथॉलॉजी लॅब तात्काळ बंद करण्याबाबत कार्यवाही करुन उक्त लॅबना अभय देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## वैद्‌यकिय शिक्षण व संशोधन विभाग आणि भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार सुधारित आकृतिबंधाप्रमाणे पदे निर्माण करण्याबाबत

**(८९) * ३८१५० श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकिय वैद्‌यकिय महाविद्‌यालय, अकोला तसेच शासकिय वैद्‌यकिय महाविद्‌यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला या दोन्ही संस्थांद्‌वारे वैद्‌यकिय शिक्षण व संशोधन विभाग आणि भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार सुधारित आकृतिबंधाप्रमाणे पदे निर्माण करण्यासाठीचा प्रस्ताव दिनांक ८ जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यासुमारास डीएमईआर, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने वाढीव पदे मंजूर करणेबाबत शासने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच सर्वोपचार रुग्णालय, अकोला करिता भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार सुधारित आकृतिबंधाप्रमाणे पदे निर्माण करणेबाबत जानेवारी, २०१८ मध्ये संचालक यांच्याकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. तथापि, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी "अतिविशेषोपचार रुग्णालय" सुरु करणेसाठी ७८७ पदे निर्माण करणेबाबत सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक १२/०२/२०१८ अन्वये संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांजकडून अधिक माहिती मागविण्यात आली आहे.

-----------------

## शासनाच्या "मनोधैर्य" योजनेंतर्गत (सीएसआर) फंडातील काही रक्कम वापरण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(९०) * ३९७७९ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या "मनोधैर्य" योजनेंतर्गत राज्यात बलात्कार, विनयभंग व ॲसिड हल्ला इत्यादीमुळे बळी पडलेल्या स्त्रियांना आर्थिक मदत देण्यासाठी खाजगी कंपन्याच्या सामाजिक जबाबदारी (सीएसआर) फंडातील काही रक्कम वापरण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) मा.उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार गठीत केलेल्या समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने सुधारित नवीन मनोधैर्य योजनेचा शासन निर्णय दिनांक ३०/१२/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यानुसार पीडितास अर्थसहाय्य मंजूर करण्याचे पूर्ण अधिकार महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांना देण्यात आलेले आहेत. या प्रयोजनासाठी त्यांच्यामार्फत स्वतंत्र बँक खाते उघडण्यात आले आहे. त्यामध्ये शासकीय निधी व्यतिरिक्त (सीएसआर) च्या माध्यमातून रक्कम जमा करण्याची तरतूद आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.